सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, ०३ जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक २८० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शेतीचे उत्पादन वाढविण्यास केंद्र शासनाचे सर्वोच्च प्राधान्य : शिवराजसिंह चौहान

## बाभळेश्वर कृषी विज्ञान केंद्रात शेतकऱ्यांशी संवाद !

शिर्डी, दि.२ – शेतकरी हा देशाचा प्राण आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी शेतीचे उत्पादन वाढविण्यास केंद्र शासनाने सर्वोच्च प्राधान्य दिले असून यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे, असे प्रतिपादन केंद्रीय कृषी, शेतकरी कल्याण व ग्रामीण विकासमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केले.

राहाता तालुक्यातील बाभळेश्वर कृषी विज्ञान केंद्र (पायरेन्स) येथे शेतकरी परिसंवादात श्री.चौहान यांनी स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद साधला. याप्रसंगी राज्याचे जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.प्रशांत पाटील, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर,भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या पुणे शाखेचे संचालक डॉ .एस.के.रॉय, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर, माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील व जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील उपस्थित होते.

आपल्याला परंपरागत शेतीकडून आता आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शेतीकडे वळावे लागणार आहे, असे नमूद करून श्री.चौहान म्हणाले , यावर्षी ३०० नवीन बीज वाणांचे संशोधन करण्यात आले आहे. खतांवरील अनुदानासाठी मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद करण्यात आली आहे. १ जानेवारी रोजी झालेल्या केंद्रीय मंत्रीमंडळ बैठकीत केंद्रशासनाने शेतकरी हिताचे काही निर्णय घेतले. त्यानुसार शेतकऱ्यांना डीएपी खतांची ५० किलोची पिशवी १ हजार ३५० रूपयात दिली जाईल.

प्रधानमंत्री कृषी विमा योजनेत पंचनामा करतांना आता 'गाव' हा घटक नुकसान




भरपाईसाठी पात्र ठरविण्यात येऊन शेतकऱ्यांना पीक विमा योजनेचा लाभ देण्यात येईल. विमा कंपन्यांनी नुकसान भरपाई देण्यात उशीर केल्यास १२ टक्के व्याजासह शेतकऱ्यांना भरपाई देतील. शेतकऱ्यांच्या पीक नुकसानीचा पंचनामा आता सॅटेलाईट रिमोट सेन्सिंगद्वारे केला जाणार आहे. यासाठी ८५२ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. ६९ हजार कोटी रूपये पीक नुकसान भरपाईसाठी संरक्षित ठेवण्यात आले आहेत, असे केंद्रीय कृषीमंत्र्यांनी सांगितले. श्री.चौहान म्हणाले पुढे म्हणाले, महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणून महिलांना आत्मसन्मानाने जगण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. आता यापुढे महिलांना आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करून लखपती दिदी बनवण्याचे उद्दिष्ट आहे. देशात ३ कोटी लखपती दिदी निर्माण करायच्या आहेत.

महाराष्ट्रात प्रत्येकाला पक्के घर मिळावे यासाठी आता प्रधानमंत्री आवास योजनेत १३ लाख २९ हजार नवीन घरांसाठी मंजुरी देण्यात आली आहे. प्रधानमंत्री आवास योजनेत जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ मिळावा, यासाठी अटी व शर्तीत शिथिलता आणण्यात आली आहे, असेही श्री.चौहान यांनी सांगितले.

मंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, शासनाने महिलांसोबत शेतकरी, युवक आणि लाडक्या भावांसाठीही लोकाभिमुख योजना राबविल्याआहेत. शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी केंद्र शासनाचे राज्य शासनाला पाठबळ मिळत आहे. कृषी विज्ञान केंद्रात येत असलेल्या नवीन कृषी तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. याप्रसंगी केंद्रीय कृषीमंत्र्यांच्या हस्ते अश्विनी कासार, मोनिका भालेराव, अश्विनी कोळपकर, कमल रोहकले, सुनिता ओहळ, सुनिता लांडे, स्वाती गागरे, कल्पना शिंदे, संगीता भागवत व मंगल खेमनर यांचा प्रातिनिधीक स्वरुपात लखपती दिदी प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यशवंत शेतकरी बाबासाहेब गोरे, आशाताई दंडवते, सुभाष गडगे, गणेश अंत्रे, नवनाथ उकिर्डे व मोहन तुंवर यांचा केंद्रीय कृषीमंत्र्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कृषी यांत्रिकीकरण आणि एकात्मिक फलोत्पादन अभियानांतर्गतचे लाभार्थी शेतकरी पंकजा दळे, जयश्री निर्मळ, भागवत जाधव व अमोल कासार यांना केंद्रीय कृषी मंत्र्यांच्या हस्ते ट्रॅक्टर वाटप करण्यात आले. याप्रसंगी कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन श्री.चौहान यांच्या हस्ते करण्यात आले. प्रदर्शनातील सहभागी शेतकरी व महिला बचतगट सदस्यांशी त्यांनी संवाद साधला. सन्मानार्थी लखपती दीदींच्यावतीने अलका कदम यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक डॉ. उत्तमराव कदम यांनी केले.

# बंदुकीसाठी स्वतःच रचला हल्ल्याचा कट; सरपंचाचा कारनामा

धाराशिव : धाराशीवच्या तुळजापूर तालुक्यातील मेसाई जवळगाचे सरपंच नामदेव निकम हल्ला प्रकरणी आता एक मोठा ट्विस्ट आलाय. आपल्यावर हल्ला केल्याचा कांगावा करणाऱ्या सरपंच निकम प्रकरणात एक नवी गोष्ट समोर आली आहे. पोलिस तपासात नेमकं असं काय समोर आलंय त्याविषयी सविस्तर जाणून घेऊया.

राज्यात सध्या सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरण बरंच गाजत आहे. इतक्यात काही दिवसांपूर्वी मेसाई जवळगा गावाचे सरपंच नामदेव निकम यांच्यावरही हल्ल्याची घटना घडली होती. या हल्ल्याचही पवनचक्की कनेक्शन असल्याचं म्हटलं जात होतं. त्यानंतर पोलिसांनीही हे प्रकरण गांभिर्याने घेत तपासाची चक्र फिरवली. मात्र, तपासातून जे समोर आलं त्याने पोलिसच चक्रावून गेलेत. कारण बंदुकीचा परवाना मिळावा यासाठी सरपंच नामदेव निकम यांनीच स्वत: वर हल्ल्याचा बनाव रचल्याच तपासात समोर आलंय. मेसाई जवळगा गावचे सरपंच नामदेव निकम यांच्यावरील हल्ल्यानंतर जिल्ह्यात एकच खळबळ उडाली होती. मात्र, पोलिसांनी यातील सत्य शोधून काढलं.

२६ डिसेंबर रोजी रात्री मेसाई जवळगाचे सरपंच नामदेव निकम यांच्यावर बाईकस्वारांचा हल्ला केला. गाडीच्या काचा फोडल्या, गाडीवर अंडी फेकली, पेट्रोलने भरलेल्या प्लास्टिकच्या पिशव्या टाकत गाडीसकट नामदेव निकम यांना जाळण्याचा प्रयत्न केला. मात्र, या हल्लातून नामदेव निकम कसे बसे बचावले. या संपूर्ण प्रकरणानंतर पोलीसात तक्रार करण्यात आली. अशात आरोपींना पकडण्यासाठी स्वत:



नामदेव निकम यांनीच टाकीवर चढून आंदोलन केलं. त्यानंतर पोलीस तपासात धक्कादायक बाब उघड झाली आणि त्यानं सगळ्यांना धक्का बसला. बंदुकीसाठी चक्क सरपंचानेच षडयंत्र रचल्याचं समोर आलं.

संतोष देशमुख हत्याप्रकरण तापले पाहून त्याचा फायदा घेऊन नामदेव निकम यांनी हल्ल्याचा बनाव रचला. बंदुकीचा परवाना मिळावा यासाठी हल्ल्याचं खोटं चित्र रंगवलं. आरोपी कितीही हुशार असला तरी कायद्यापासून जास्त काळ पळू शकत नाही. हेच या प्रकरणातून दिसून येतंय. या संपूर्ण प्रकरणानंतर इतर लोकांनाही मोठा धक्का बसला आहे. तर कोणी फक्त बंदूकीचा परवाना मिळावा यासाठी स्वत: विरोधात कट कसा रचू शकतो असा प्रश्न उपस्थित केला आहे.


## टायर फुटल्याने चार चाकीचा अपघात! एक ठार तर एक जखमी



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.०२ जानेवारी – नवीन वर्षाच्या प्रारंभाला शहरातील युवकाला आपला जीव गमवावा लागल्याची दुर्दैवी घटना काल दि.०१ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास घडली आहे,

सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर शाकंभरी जिंनिग लगत दि.०१ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास शहरातील युवक आपल्या चारचाकी वाहन क्रं एम.एच.२० जी.ई.२५५८ ने छत्रपती संभाजीनगर वरून कन्नडच्या दिशेने येत होते,जिंनिग लगत येताच वाहनाचे टायर फुटल्याने चालकाचा ताबा सुटून त्यांची कार दुभाजकाला जाऊन धडकली आणि कारने दोन ते तीन पलट्या घेऊन महामार्ग लगत पलटी झाली,अपघात एवढा गंभीर होता त्यात कार सर्व बाजूने



सुनील जाधव मयत



मयूर वाळुंजे जखमी

फुटली होती,

अपघात घडताच रात्रीची गस्त घालणाऱ्या पोलिसांनी जखमी अवस्थेत सुनिल जाधव वय २३ वर्षे,रा.म्हाडा कॉलनी, मयूर वाळुंजे वय २६ वर्षे रा.निसर्ग सिटी कन्नड यांना तत्काळ घाटी रुग्णालयात दाखल केले असता सुनील यास वैद्यकीय अधिकारी मनीषा मोतिंगे यांनी तपासून मृत घोषित केले,तर मयूर यास पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात आले.

## राज्यातील ४,८४९ एकर जमीन शेतकऱ्यांना परत करणार

मुंबई : महाराष्ट्रातील शेतक–यांसाठी अतयंत महत्त्वाची बातमी आहे. मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीत शेतक–यांसाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य सरकार ४ हजार ८४९ एकर जमीन शेतक–यांना परत करण्यात येणार आहे. महसूल विभागाच्या या निर्णयाचा राज्यातील ९६३ शेतक–यांना फायदा होणार आहे.

राज्यातील ९६३ शेतर्क़यांच्या ४ हजार ९४९ जमिनी शासन दरबारी जमा आहेत. शेतसारा न भरल्यामुळे या जमिनी तहसीलदार यांनी शासन जमा केल्या होत्या. मुख्यमंत्री देवंद्र फडणवीस यांनी संपूर्ण ९६३ शेतर्क़यांच्या जमिनी पुन्हा शेतकऱ्यांच्या नावावर करण्याचा निर्णय घेतला आहे. रेडी रेकनर दराच्या २५ टक्के इतका रक्कम भरून ही जमिन पुन्हा नावावर केली जातील. अनेक दिवसांपासून हा निर्णय प्रलंबित होता. अखेर शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

शेतक–यांना विमा कंपन्या वेळेवर पिक विमा देत नसल्यामुळे आता केंद्र सरकारने पिक विमा कंपन्यावर आता बारा टक्के व्याज लावणार असल्याच स्पष्ट केलय..नवीन वर्षाच्या पार्शभुमीवर केंद्राच्या कॅबीनेट बैठकीत शेतक–यांच्या हिताचे अनेक निर्णय घेण्यात आल्याच मंत्री चौहान यांनी सांगितलय.

# महाराष्ट्रातील 10 बड्या अधिकाऱ्यांच्या तडकाफडकी बदल्या

मुंबई : सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे राज्याचे वातावरण चांगलेच तापले आहे. यासह अनेक मंत्र्यांनी आपल्या पदाचा पदभार स्विकारलेला नाही. यावरुन विरोधकांनी महायुती सरकारवर हल्लाबोल केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अॅक्शनमोडवर आले आहेत. कॅबनेट बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महायुतीतील मंत्र्यांची कानउघाडणी केल्याची माहिती आहे. यासह प्रशासकीय पातळीवर देखील मोठ्या हाचलाली झाल्या आहेत. महाराष्ट्रातील १० बड्या अधिकाऱ्यांच्या तडकाफडकी बदल्या करण्यात आल्या आहेत.

विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाले आहे. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्राचा पदभार स्विकारला. तर, अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यावर उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. राज्यात नवं सरकार स्थापन झाल्यानंतर प्रशासनात देखील फेरबदल पहायला मिळत आहेत. मंत्रालयात मोठ्या हालचाली पहायला मिळत आहेत. महाराष्ट्र सरकारने काही अधिकाऱ्यांच्या तडकाफडकी बदल्या केल्या आहेत. तर, काही अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीचे आदेश जारी करण्यात आले आहेत.


राज्य शासनाच्या आदेशानुसार राज्यातील १० आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

१) जयश्री भोज यांची महाआइटी येथून अन्न आणि नागरी पुरवठा विभागाच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. २) साताऱ्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र दुड्डी यांची पुणे येथे जिल्हाधिकारी म्हणून बदली झाली आहे. ३) विनिता वेद सिंघल, प्रधान सचिव, कामगार यांची प्रधान सचिव, पर्यावरण, म्हणून नियुक्ती झाली आहे. ४) आय ए कुंदन, एसीएस स्कूल एज्यु. प्रधान सचिव, कामगार म्हणून नियुक्ती ५) मिलिंद म्हैसकर, अपर मुख्य सचिव, वने आणि महसूल ६) वेणुगोपाल रेड्डी, एसीएस फॉरेस्ट, एसीएस, हायर आणि टेक. एड्यु. ७) निपुण विनायक, रुसा सचिव, पब हेल्थ ८) संतोष पाटील, सीईओ जि.प. पुणे यांची जिल्हाधिकारी, सातारा ९) हर्षदीप कांबळे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय १०) विकासचंद्र रस्तोगी, प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण. प्रधान सचिव, कृषी म्हणून नियुक्ती.

## शासकीय कर्मचाऱ्यांचं वेतन आता मुंबै बँकेतून करण्याचा सरकारचा निर्णय

मुंबई : महायुती सरकारची नव्या वर्षातील पहिलीच मंत्रिमंडळ बैठक पार पडली. खातेवाटपानंतर पार पडलेल्या या बैठकीत राज्य सरकारने एक महत्वाचा निर्णय घेतलाय. शासकीय कर्मचाऱ्यांचं वेतन आता मुंबै बँकेतून करण्याचा निर्णय सरकारने घेतलाय. भाजप नेते प्रवीण दरेकर अध्यक्ष असलेल्या या बँकेतून आता सरकारी व्यवहार होणार आहेत.

महत्वाचं म्हणजे अर्थमंत्री अजित पवार गैरहजर असतानाच संबंधित प्रस्ताव कॅबिनेटमध्ये मांडण्यात आला आणि मंजुरही




करण्यात आला. सरकारी कर्मचाऱ्यांचं वेतन कोणत्या बँकेतून करायंच हे ठरवण्यासाठी काही निकष असतात. रिझर्व्ह बँकेच्या निकषानुसार भांडवल पर्याप्तता गुणोत्तर ९ टक्के आवश्यक असते.

मुंबै बँकेचं भांडवल पर्याप्तता गुणोत्तर ७.११ टक्के इतके आहे. लेखापरिक्षणाचा 'अ' दर्जा आवश्यक आहे. मुंबै बँकेचं लेखापरिक्षण ब दर्जाचं आहे. २०२५ मध्ये २०१९-२० चा लेखापरिक्षण अहवाल विचारात घेतला जातो. लेखापरिक्षण अहवालात बँक ४७ कोटी रूपये तोट्यात असल्याचे नमूद आहे.

सरकारच्या या निर्णयानंतर अंबादास दानवे यांनी टिका करत मुंबै बँकेबाबतचा निर्णय अन्य बँकांनाही लागू करा असं म्हटलंय.. दरम्यान मुंबै बँकेबाबतचा निर्णय योग्य आहे असं चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटंलय...तर नाबार्ड, आरबीआयच्या नियमानुसारच बँक चालते, विरोधकांचे आरोप बिनबुडाचे असल्याचं प्रवीण दरेकर म्हणत आहेत.

सरकारी कर्मचार्यांचं वेतन आणि भत्ता कोणत्या बँकेत जमा करावेत, यावरून वारंवार चर्चा होत असते. राजकीय पक्षांमध्येही अनेकदा कलगीतुरा रंगलेला आहे. त्यातच मुंबै बँक आरबीआयच्या अनेक निकषात बसत नाही...तरीही हा निर्णय घेण्यात आल्याने सरकार आपल्या आमदाराच्या बँकेवर मेहेरबान असल्याची चर्चा आहे.

## मंत्रालयातील गर्दी टाळण्यासाठी एफआरएस यंत्रणा; प्रत्येक प्रवेशद्वारावर होणार स्कॅनिंग

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.१ जानेवारी : मंत्रालयातील वाढती गर्दी आणि त्यापासून निर्माण होणारे कायदा व सुव्यवस्थेची समस्या कमी करण्यासाठी एफआरएस हे अद्यावत तंत्रज्ञान सुरु केले जाणार आहे. मंत्रालयाच्या सर्व प्रवेशद्वारावरती ही यंत्रणा बसविण्यात आली आहे. त्यानंतर मंत्रालयाच्या इमारतीमध्ये प्रवेश करतानाही पास स्कॅनिंग केल्यानंतरच आत मध्ये प्रवेश केला जाणार आहे.

अभ्यंगताचे ज्या विभागात काम असेल, केवळ त्याच विभागात संबंधितांना जावे लागणार आहे. इतर कुठल्याही ठिकाणी जात असेल तर त्यावर पोलिसांची करडी नजर असणार आहे.

अशी असणार एफआरएस यंत्रणा : मंत्रालयात जर कोणाला प्रवेश करायचा असेल तर अभ्यंगताना ऑनलाईन पास स्वता काढता येईल किंवा मंत्रालय गेटवर काढता येईल. गेटवरून प्रवेश केल्यानंतर इमारतीमध्ये प्रवेश करताना पुन्हा स्कॅन केल्याशिवाय मुख्य इमारतीत प्रवेश नाही.

अभ्यंगताना ज्या विभागात जायचं आहे त्या ठिकाणाहून दुसरीकडे गेले तर पोलिसांची नजर असणार आहे. मंत्रालयात येऊन कोणी आत्महत्या करण्याचा प्रयत्न किंवा कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केल्यास पुन्हा त्या अभ्यंगताला मंत्रालयात प्रवेश मिळणार नाही. ब्लॅक लिस्टमध्ये नाव टाकले जाणार आहे.

या तंत्रज्ञानामुळे पास घेण्यासाठी मंत्रालयाच्या बाहेर तासन् तास उभे राहण्याची गरज लागणार नाही.

सर्व सचिव ,अधिकारी, मंत्री यांनाही फेस आयडी तयार केल्यानंतरच प्रवेश मिळणार

त्यामुळे मंत्र्यांच्या किंवा आमदारांच्या सोबत येणाऱ्या कार्यकर्त्यांच्या गर्दीवर मर्यादा येणार आहे. प्रत्येक गेटवरील एफआरएस सिस्टम ही मंत्रालय कंट्रोल रुमला कनेक्ट असणार आहे. त्यामुळे अभ्यंगत किंवा आलेला व्यक्ती मंत्रालयात कुठे जातोय यावरती पोलिसांच लक्ष असणार आहे. मंत्रालयात साधारणता ८००० अधिकारी आणि कर्मचारी यांची संख्या आहे. कॅबिनेटच्या दिवशी अभ्यंगताची संख्या पाच ते सहा हजार असते त्यामुळे १२ ते १५ हजारावर गर्दी होते.

## अन्नछत्र प्रसादालयाचे खा. संदिपान भुमरे यांच्या हस्ते शुभारंभ

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०२ :- श्रीसंत एकनाथ महाराज विश्वस्त मंडळाच्या वतीने ब सुरू करण्यात आलेल्या अन्नछत्र प्रसादालयाचे शुभारंभ खासदार संदिपान भुमरे यांच्या हस्ते करण्यात आले आहे .

श्रीसंत एकनाथ महाराज यांच्या दर्शनासाठी राज्यातील विविध ठिकाणाचे वारकरी भाविक भक्त पैठण येथे येतात या भाविक भक्तांना इतर देवस्थानाप्रमाणे मोफत अन्नछत्र प्रसादालयाचे सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मंदिर विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष आमदार विलास बापू भुमरे यांच्या व कार्यकारी विश्वस्त दादा पाटील बारे व विश्वस्त मंडळाच्या सदस्यांच्या माध्यमातून मोफत अन्नछत्र सुरू करण्याची संकल्पना मंडळाच्या बैठकीत ठरविण्यात आल्याने छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याचे खासदार संदिपान भुमरे यांच्या हस्ते या अन्नछत्र प्रसादालयाचे शुभारंभ करण्यात आला यावेळी कार्यकारी विश्वस्त दादा पाटील बारे यांनी अन्नछत्र प्रसादालयाचे कार्याची माहिती दिली. याप्रसंगी

विश्वस्त मंडळाचे सदस्य अपर जिल्हाधिकारी



अरविंद लोखंडे, ह.भ.प रघुनाथबुवा गोसावी पालखीवाले, ह.भ.प विठ्ठल चनघटे, प्रा. गणेश मोहिते, राज्य दूध संघाचे संचालक नंदलाल काळे, श्याम तांगडे, शहादेव लोहारे, पोलीस निरीक्षक संजय देशमुख,तालुकाप्रमुख अण्णासाहेब लबडे, राजेंद्र मापारी, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष पवन लोहिया, बलराम लोळगे, ह.भ प काकडे महाराज,जिल्हाप्रमुख किशोर चौधरी, संतोष बोठे, राजेंद्र मिसाळ, बाळासाहेब पठाडे,महेश खोचे, वाणी, निवारे, मापारी यांच्यासह वारकरी भाविक भक्त मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

## दुचाकी अन् ट्रकचा अपघात, दोन मित्रांचा मृत्यू; एक गंभीर

नागपूर : तीन मित्र जेवणाचा डबा घेऊन मोटरसायकलने हिंगण्याकडे येत असताना विरुद्ध बाजूने येणाऱ्या ट्रकने त्यांना जोरदार धडक दिली. यात मोटरसायकल चालकासह त्याचा एक मित्र जागीच ठार झाले. तर मागे बसलेला युवक सुद्धा गंभीर जखमी झालाय. हा अपघात बुधवारी मध्य रात्रीच्या सुमारास गुंमगाव मार्गावर घडला. आर्यन हुकूमचंद पालिवाल( वय २३),सुमेध उर्फ सुमित राहुल सिरसाट (वय १७) अशी मृत्यू झालेल्या मुलांची नावे असून अरमान रवींद्र मडामे (वय १७) हा गंभीर जखमी झालाय. त्याला उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. हे तिघेही मोटरसायकल स्वार महाजनवाडी ,वानाडोंगरी हिंगणा रोड नागपूर येथील रहिवासी असून मित्र आहेत.

# छत्रपती संभाजीनगर ते पैठण चौपदरी रस्त्याच्या कामासाठी काळ्या भुसभुशीत मातीचा वापर

### ठेकेदारांची मनमानी संबंधित अधिकाऱ्याचे दुर्लक्ष

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि .२ जानेवारी छत्रपती संभाजीनगर ते पैठण रस्त्याचे व जलवाहिनी टाकण्याचे काम जवळपास एक वर्षापासून सुरू आहे आज पर्यंत दोन्ही कामे पूर्ण झाले नसून या कामामुळे वाहन धारक तसेच नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

जलवाहिनी कामामुळे वाहतुकीची रोज बिडकीन व चितेगाव येथे मोठी कोंडी होत आहे, छत्रपती संभाजीनगर ते पैठण रस्त्याचे काम सद्यास्थितीत प्रगती पथावर सुरु असून, परंतु संबंधित ठेकेदार चौपदरी रस्त्याच्या कामासाठी भराव करण्याकरिता मुरुमाऐवजी चक्क काळया मातीचा



वापर ठेकेदाराकडून केला जात आहे,

यामुळे भविष्यात या रस्त्याची गुणवत्ता टिकून राहते की नाही, याबाबत शंका उपस्थित केली जात आहे,पैठण ते छत्रपती संभाजीनगर रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण ही संस्था करत असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जायकवाडी ते छत्रपती संभाजीनगर दोन हजार पाचशे मिमी व्यासाची जलवाहिनी टाकण्याचे काम करत आहे,

ही जलवाहिनी टाकण्यासाठी खोदकाम केले जात असून त्यातून निघालेली काळी भुसभुशीत माती इतरत्र न टाकता ती रस्त्याच्या कामासाठी वापरली जात आहे, जलवाहिनी टाकण्यासाठी रोज शेकडो ब्रास मातीचा उपसा होत असून यातील निम्मी माती रिकाम्या भूखंडावर टाकली जात असून तर शेकडो ब्रास काळी मातीचा पैठण रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामात वापर केला जात आहे,

यामुळे भविष्यात या रस्त्याची गुणवत्ता टिकून राहते की नाही, याबाबत शंका निर्माण होत आहे,याकडे संबंधित अधिकारी यांनी लक्ष देणे गरजेचे आहे, अशी नागरिकांमध्ये चर्चा होत आहे.



बीड तालुक्यात यावर्षी प्रतिवर्षी पेक्षा तुरीचे पीक बहरले असून शेंगा मोठ्या प्रमाणात लखडल्या आहेत. (छाया–श्रीकांत कुलकर्णी )

# नगरपरिषदेच्या दुर्लक्षामुळे पुरातन वैद्यनाथ मंदिराच्या दक्षिण पायऱ्यांची तोडफोड

## नगरपरिषदेने त्वरित पायऱ्या पूर्ववत करावयात :भाजप नेते अश्विन मोगरकर

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैजनाथ दि.२ जानेवारी**

नगरपरिषदेच्या दुर्लक्षामुळे तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत होणाऱ्या कामात पुरातन वैद्यनाथ मंदिराच्या दक्षिण पायऱ्याचे होणारे पाडकाम त्वरित बंद करावे, व पायऱ्या पूर्ववत कराव्यात अशी मागणी अश्विन मोगरकर यांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन केली आहे.

भारतातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथाच्या मंदिरासाठी व भाविकांना सुविधा मिळाव्यात यासाठी महाराष्ट्र सरकारने २०१९ साली तत्कालीन मंत्री पंकजा मुंडे यांनी तिर्थक्षेत्र विकास योजनेतून १३३ कोटी ५८ लाख रुपयांचा विकासनिधी मंजूर करून आणला होता. या योजनेअंतर्गत मंदिराच्या पुर्वेस हरिहर तिर्थाजवळ दर्शन मंडप,दक्षिणमुखी गणेश मंदिराच्या पाठिमागे ४० खोल्यांचे यात्री निवास,शनि मंदिराच्या पाठिमागे २० खोल्यांचे यात्री निवास,मेरुगिरी पर्वतावर ८ खोल्यांचे कॉटेजेस व उपहारगृह,उद्यान विकसित करणे,वैद्यनाथ मंदिर भोवताली दगडी फरशी बसवणे,नगरपालिकेजवळ वास्तुशिल्प प्रवेशद्वार बांधणे,मेरुगिरी पर्वताभोवती सिमेंट कॉंक्रीटचा प्रदक्षिणा मार्ग करणे,वैद्यनाथ मंदिराच्या पुर्वेकडील वाहनतळ विकसित करणे,हरिहर तिर्थाभोवती उद्यान विकसित करणे,दक्षिणमुखी गणेश मंदिराजवळ १५० व्यक्ती बसु शकतील असा सभामंडप बांधणे तसेच शहरात विविध ठिकाणी सौंदर्यीकरण व विकासकामे होणार होती. पुढे २०२३ मध्ये महाराष्ट्र सरकार मध्ये मंत्री असलेले धनंजय मुंडे यांनी या योजनेत बदल करीत २८६ कोटी रुपयांचा वाढीव आराखडा मंजूर केला.







या तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत मंदिराच्या पूर्व भागात प्रति वैद्यनाथ मंदिराजवळ दर्शन मंडप बांधण्याचे काम सुरू आहे.या इमारती जवळ असलेल्या दक्षिण व पूर्व बाजूस असलेल्या काही पायऱ्या ही इमारत बांधताना गुत्तेदाराने चक्क काढून टाकल्या आहेत. या योजनेत होणाऱ्या कामांच्या गुणवत्तेवर संपूर्ण लक्ष व नियंत्रण ठेवण्याचे काम परळी नगरपरिषदेकडे आहे. या योजनेच्या उद्घाटन करतेवेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, तीर्थक्षेत्र विकास योजनेत होणाऱ्या कामामुळे मूळ मंदिराच्या रचनेत कुठल्याही प्रकारचा बदल होणार नसल्याचे सांगितले होते. तसेच या तीर्थक्षेत्र विकास योजनेच्या वर्कऑर्डर मध्ये मंदिराच्या संरचनेत कुठलाही बदल न करण्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. परंतु नगरपरिषदेच्या प्रशासनाने याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करीत गुत्तेदारास मोकळे रान दिल्याने दक्षिण दिशेकडे असलेल्या पुरातन पायऱ्या काढून टाकल्या आहेत. शेकडो वर्षांपूर्वीच्या पूर्व पायऱ्याचा काही भाग तर दक्षिण भागातील पूर्ण पायऱ्या पैसे वाचवण्यासाठी सदरील गुत्तेदाराने तोडून तिथून बांधकाम साहित्य वाहतुकीसाठी रस्ता बनवला.

पुरातन ज्योतिर्लिंगवैद्यनाथ मंदिराच्या दक्षिण व पूर्व पायऱ्या पडण्याचे त्वरित थांबवावे व तोडलेल्या पायऱ्या त्वरित पूर्ववत करावे. तसेच मंदिराच्या पूर्वेकडील प्रतिवैद्यनाथ मंदिराजवळील पुरातन चिंचेचे महाकाय झाड कोणत्याहि परिस्थितीत तोडले जाऊ नये या मागणीचे निवेदन बुधवार, १ जानेवारी रोजी अश्विन मोगरकर यांनी परळी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे यांना दिले आहे.



बीड तालुक्यातील बालाघाटावरील लिंबागणेश पंचक्रोशीतील ४-५ दिवसांपासून असलेल्या ढगाळ वातावरणामुळे तसेच काही ठिकाणी हलक्या सरी पडल्या असुन काही ठिकाणी पावसाचा शिडकाव झाला आहे त्यामुळे हरभरा पिकांवर अळ्यांचा प्रादुर्भाव झाला असुन या रोगांवर नियंत्रण मिळवण्यासाठी किटकनाशकांची फवारणी करावी लागत असल्याने महागड्या औषधांचा आर्थिक भुर्दंड शेतकऱ्यांना सोसावा लागत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला असुन शेतकरी हवालदिल झाला आहे.

# ‘१०० दिवसांचे लक्ष्य अंतर्गत’ विशेष मोहिमेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ जानेवारी**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये व्यवसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांची जात वैधता प्रमाणपत्र अभावी गैरसोय होऊ नये, कोणताही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये यासाठी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती बीड मार्फत ‘१०० दिवसांचे लक्ष्य अंतर्गत’ विद्यार्थ्यांना त्रुटी पुर्ततेसाठी व तयार असलेले जात वैधता प्रमाणपत्र समिती स्तरावरून निर्गमित करण्यासाठी विशेष मोहीम आयोजित करण्यात आलेली आहे.

सन २०२४-२५ मध्ये इयत्ता ११ वी १२ विज्ञान व व्यावसायिक पाठ्यक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी बीड समितीच्या कार्यक्षेत्रातील ज्यांचे जातीचे प्रमाणपत्र पडताळणी होऊन जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी समितीकडे अर्ज दाखल केलेले आहेत. अशा सर्व जाती दावा प्रकरणांमध्ये समिती स्तरावर प्राथमिक छाननी करून ज्या प्रकरणांमध्ये कागदपत्रे पुराव्या अभावी त्रृटी आढळून आलेली आहे, अशा प्रकरणांमध्ये विद्यार्थ्यांना त्यांनी दिलेल्या जाती दावा प्रस्तावामध्ये नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएस द्वारे अथवा लेखी पत्रान्वये त्रृटी असल्याचे कळविण्यात आलेले असून शैक्षणिक, सेवा, निवडणूक व इतर कारणासाठी जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी प्रस्ताव कार्यालयात प्रलंबित आहेत.

अनुसुचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनीयमन) अधिनियम २००० मधील कलम ८ अन्वये जाती दावा सिद्ध करण्याची जबाबदारी अर्जदार यांची असल्याने जाती दावा पडताळणी कामे तात्काळ समितीकडे आपल्या प्रकरणातील त्रुटी पूर्तता करण्यात यावी, जेणेकरून सन २०२४-२५ यापुढील शैक्षणिक वर्षांमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार व्यावसायिक पाठ्यक्रमाकरिता राखीव प्रवर्गातून आरक्षित जागेवर प्रवेश घेण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यास प्रवेश प्रक्रिया नोंदणी अर्जासोबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.जात पडताळणी कार्यालयात त्रुटी पुर्ततेअभावी जाती दावा समितीकडून फेटाळण्यात आल्यास तसेच शैक्षणिक प्रवेशासाठी, निवडणूक, सेवेसाठी आपात्र ठरल्यास याची जबाबदारी अर्जदार उमेदवारांची राहील त्यामुळे समितीच्या वतीने विशेष अभियान दरम्यान कार्यालयीन वेळेत प्रमाणपत्र पडताळणी ‘१०० दिवसांचे लक्ष्य अंतर्गत’ त्रुटी पुर्तता विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष शिबिराचा जास्तीत जास्त अर्जदारांनी लाभ घ्यावा व सन २०२४-२५या शैक्षणिक वर्षांमध्ये इयत्ता ११ वी, १२ वी विज्ञान शाखेत प्रवेशित विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी समितीकडे अर्ज दाखल करावेत, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती बीड कार्यालयाकडून करण्यात आले आहे.



माहिती अधिकारी अंजू कांबळे- निमसरकर यांची दिल्ली येथील कार्यालयात सेवावर्ग झाल्यामूळे त्यानां जिल्हा माहिती कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या वतीने निरोप देण्यात आला. **(छाया–कृष्णा शिंदे)**

# नववर्षाच्या पूर्वसंध्येला शिधापत्रिकाधारकांना गिफ्ट

## एपीएल धारकांच्या खात्यात २ कोटी ४१ लाख ४१ हजार जमा
## उर्वरित शिधापत्रिकाधारकांनी केवायसी करून घ्यावी- आ.संदीप क्षीरसागर



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ जानेवारी**

नववर्षाच्या पूर्वसंध्येला बीड तालुक्यातील एपीएल रेशन कार्डधारकांना नवीन वर्षाचे गिफ्ट मिळाले आहे. दि.३१ डिसेंबर रोजीच्या संध्याकाळी एपीएल कार्ड धारकांच्या खात्यात २ कोटी ४१ लाख ४१ हजार एकसष्ठ हजार रूपये जमा झाले आहेत. उर्वरित शिधापत्रिकाधारकांनी लवकरात बँक केवायसी करून घ्यावी असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

बीड तालुक्यात प्राधान्य कुटुंब योजनेचे ६३४८७ , अंत्योदय योजनेचे ७३८४ , ए पी एल योजनेचे शेतकरी १९०६६ , एन पी एच योजनेचे ९२७७ , शुभ्र शिधापत्रिका धारक १५६८ असे एकुण १००७८२ शिधापत्रिकाधारक आहेत . तालुक्यात एकुण ३४८ स्वस्त धान्य दुकाने आहेत . १९०६६ एपीएल शेतकऱ्यापैकी ५८०० शिधापत्रिकाधारक यांना एपीएल डीबीटी द्वारे रोख रक्कम प्राप्त झाली असून त्यापैकी ३७८२ लाभार्थी यांच्या खात्यात प्रतिव्यक्ती १७० प्रमाणे २ कोटी ४१ लाख ४१ हजार ६१ रूपये महिला कुटुंब प्रमुखांच्या खात्यात नवीन वर्षाच्या पूर्व संध्येला जमा झाले आहेत. उर्वरित २०१८ शेतकरी लाभार्थी यांनी बँक खाते केवायसी न केल्याने खात्यात रक्कम जमा झालेली नाही. त्यामुळे उर्वरित शिधापत्रिकाधारकांनी बँक केवायसी करून घ्यावी. तसेच ज्या एपीएल शिधापत्रिकाधारक शेतकरी यांनी तहसील कार्यालयात फार्म भरुन दिलेला नाही त्या शिधापत्रिका धारक यांनी आपल्या कुटुंबातील महिलेचे बँक पासबुक, आधार कार्ड व कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीचा सातबारा तहसील कार्यालयात जमा करावा असे असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.यासोबतच सध्या पीएचएच व अंत्योदय शिधापत्रिका धारक यांची ईकेवायसी स्वस्त धान्य दुकानदारा मार्फत करणे सुरू असून लहान मुले व वयस्कर कुटुंब प्रमुख यांची केवायसी सध्या होणार नसून कुटुंबातील इतर व्यक्ती यांनी केवायसी साठी स्वस्त धान्य दुकानदार यांच्याकडे जाऊन ई-केवायसी करावी. ही सुविधा निशुल्क उपलब्ध आहे. त्यासाठी कोणताही खर्च आकारण्यात येत नाही. याबद्दल तहसिल कार्यालयाकडून बीड तालुक्यातील एकूण ३४८ स्वस्त धान्य दुकानदार यांना सूचित करण्यात आले आहे. दरम्यान ई-केवायसी करताना नागरिकांना कसल्याही प्रकारची अडचण होऊ नये, आर्थिक मागणी केली जाऊ नये व नागरिकांची गैरसोय होऊ नये अशा सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी तहसिलदार व संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

## संघ हीच जीवनगाथा



अलक (२)

### साक्षात्कार

आपली पूण्य भूमी भारत माता. या पुण्यभूमीचे राष्ट्रजीवन हे हिंदू राष्ट्रजीवनच आहे. या त्रिकालाबाधित सत्याचा साक्षात्कार परमपूजनीय डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांना बाल्यावस्थेतच झाला. हिंदुराष्ट्र हे वादातीत सत्य आहे आणि म्हणूनच राष्ट्र सेवेचे व्रत हाती घेऊन त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संघटना उभी केली. डॉ. स्वत: वृत्तीने कर्मठ व स्वतंत्र बाण्याचे होते. ते सत्यप्रिय राष्ट्रभक्त होते. त्यांनी संघाच्या माध्यमातून हिंदूमध्ये चेतना जागृत केली. हे जागृत चैतन्यच आपल्या राष्ट्राच्या उज्वल भविष्याची हमी देऊ शकतो.

क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

# चांगल्या न्यायदान प्रक्रियेसाठी वकिलांचे चांगले सहकार्य कायम राहावे : न्यायाधीश अंजू शेंडे

## बार असोसिएशनच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण समारंभ व स्नेहमेळावा उत्साहात



नगर - मोठा ऐतिहासिक वारसा व परंपरा लाभलेल्या नगरच्या जिल्हा न्यायालयात न्यायाधीश व वकिलांमध्ये खेळीमेळीच्या वातावरणाची नगरच्या बारची परंपराच आहे. अशा बारमध्ये काम करणे हे माझे सौभाग्य आहे. वकिलांची साद चांगली असल्याने न्यायाधीशांचा प्रतिसादही चांगलाच असणार आहे. त्यामुळे चांगल्या न्यायदान प्रक्रियेसाठी वकिलांचे असेच चांगले सहकार्य कायम राहावे, अशी अपेक्षा प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी व्यक्त करत वकील संघटनेच्या नव्या पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

अहमदनगर बार असोसिएशनच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण समारंभ, बारच्या नव्या २०२५ वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन व बार असोसिएशनचे नवनिर्वाचित अध्यक्ष राजेश कातोरे यांचे अभीष्टचिंतन प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांच्या हस्ते झाले. नव्या वर्षाच्या पहिल्या दिवसाच्या सायंकाळी जिल्हा न्यायालयातील आवारात हा स्नेहमेळावा उत्साहात झाला. यावेळी जिल्हा सरकारी वकील सतीश पाटील, ज्येष्ठ विधीज्ञ व केंद्र सरकारचे वकील सुभाष भोर, बार असोसिएशनचे नवनिर्वाचित अध्यक्ष राजेश कातोरे, मावळते अध्यक्ष नरेश गुगळे, नूतन उपाध्यक्ष वैभव वाघ, सचिव संदीप बुरके, महिला सहसचिव जया पाटोळे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी असोसिएशनचे आजी माजी पदाधिकारी, सर्व न्यायाधीश व मोठ्या संख्येने वकीलवर्ग उपस्थित होता. यावेळी प्रातिनिधिक स्वरुपात उपस्थित वकिलांना नव्या दिनदर्शिकेचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभय राजे यांनी केले. संघटनेचे सचिव संदीप बुरके यांनी आभार मानले. यावेळी ज्येष्ठ विधीज्ञ सुरेश लगड, सुनील सूर्यवंशी, असोसिएशनचे सहसचिव मनिष केळगंद्रे, खजिनदार अनुराधा येवले, कार्यकारणी सदस्य अभिजीत देशमुख, निखिल ढोले, दीपक आडोळे, विजय केदार, रामेश्वर कराळे, शिवाजी शिंदे व ज्योती हिमणे आदींसह मोठ्या संख्येने वकील वर्ग उपस्थित होता. यावेळी नूतन अध्यक्ष राजेश कातोरे यांनी मावळते अध्यक्ष नरेश गुगळे यांच्या कडून पदभार स्वीकारल्यावर प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी यांनी ॲड. कातोरे यांचा सत्कार करून अभिनंदन केले. तसेच त्यांच्या वाढदिवसानिमित्त अनेक वकिलांनी त्यांचे अभीष्टचिंतनही केले. न्या.अंजू शेंडे पुढे म्हणल्या, न्यायलयात ताणतणावात काम करूनही इतर अनेक उपक्रमांमध्ये वकील वर्गाचा मोठा सहभाग असतो. त्यामुळे न्यायालयात जर एखादा उपक्रम सुरु केला किंवा एखाद्या उपक्रमाला वकिलांनी सहकार्य केले तर तो यशस्वी व कायम स्मरणीय होतो. व्यवसाय व संसार सांभाळणाऱ्या महिला वकिलांकडे माझे विशेष व वैयक्तिक लक्ष आहे. त्यांच्या अडचणी सोडवण्यास व वकील संघानेचेही जे काही प्रश्न व मागण्या आहेत त्याही सोडवण्यास प्राधान्य देऊ.

# रोटरीच्या कॅन्सर व्हॅन चे आज लोकार्पण

## महिलांमधील कॅन्सरचे तत्काळ होणार निदान

छ. संभाजीनगर - रोटरी क्लब औरंगाबाद, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ आणि रोटरी फाउंडेशन यांच्या सहकार्यातून ग्लोबल ग्रँट प्रोजेक्ट अंतर्गत ५० लाख रुपये खर्चून तयार केलेल्या वूमन्स हेल्थ ऑन व्हील्स या कॅन्सर निदान व्हॅन चा उद्या दि. ३ जानेवारी रोजी लोकार्पण सोहळा सकाळी साडे दहा वाजता विभागीय कॅन्सर रुग्णालय, आमखास मैदान समोर होणार आहे. यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाचे अधिष्ठता डॉ. शिवाजी सुक्रे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहे.

डिस्ट्रीक गव्हर्नर डॉ. सुरेश साबू आय.पी.डी.जी . स्वातीताई हरकळ यांच्या प्रयत्नांतून ही कॅन्सर व्हॅन तयार झाली आहे अशी माहिती सतीश लोणीकर यांनी

दिली. ग्रामीणभागातील अनेक महिलांना या व्हॅनचा फायदा होणार आहे. रोटरी फाउंडेशन ही जगभरातील एक नामांकित संस्था आहे आणि जगभरामध्ये रोटरी फाउंडेशन च्या माध्यमातून वेगवेगळे समाज उपयोगी प्रोजेक्ट घेत असते. कॅन्सर तपासणी आणि निदान व्हॅन आधुनिक तपासणी साधनांनी सुसज्ज असून विभागीय कॅन्सर रुग्णालयास ती प्रदान करण्यात येणार आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे कॅन्सरचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. जनजागृती, लवकर तपासणी आणि तत्काळ निदान न झाल्याने मृत्यु दरही वाढला आहे. वेळीच तपासणी करून निदान झाल्यास कॅन्सरमुळे होणारे मृत्यू कमी करता येऊ शकतात. त्यासाठी ही व्हॅन अतिशय महत्वाची ठरणार आहे. उद्या होणाऱ्या लोकार्पण कार्यक्रमास अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

## टाटा मोटर्सने राज्यात ट्विन-सिलिंडर टेकसह स्तर उंचावला

मुंबई : टाटा मोटर्स या भारतातील आघाडीच्या ऑटोमोटिव्ह उत्पादक कंपनीने सीएनजी वेईकल श्रेणीमध्ये मोठे प्रयत्न करणे सुरू ठेवले आहे, जेथे मार्केट लीडर म्हणून स्वत:ला प्रस्थापित केले आहे. प्रबळ उत्पादन पोर्टफोलिओ आणि धोरणात्मक उपक्रमांसह कंपनीने आर्थिक वर्ष २०२४ च्या पहिल्या सहामाहीत एकूण सीएनजी श्रेणीमध्ये २१.१ टक्क्यांचा प्रभावी मार्केट शेअर संपादित केला. महाराष्ट्रात, या कालावधीदरम्यान ब्रँडच्या एकूण कार विक्रीमध्ये ३४ टक्के सीएनजी वेईकल्स होत्या, ज्यामधून प्रबळ प्रादेशिक वाढ दिसून येते. टाटा मोटर्सची शाश्वत गतीशीलतेप्रती कटिबद्धता विकसित होत असलेल्या ऑटोमोटिव्ह लँडस्केपशी जुळवून घेण्याच्या त्यांच्या सक्रिय दृष्टिकोनामधून दिसून येते. टिएगो, टिगोर, नेक्सॉन, अल्ट्रोज आणि पंच असे लोकप्रिय मॉडेल्स सीएनजी विक्रीला गती देण्यामध्ये साह्यभूत ठरले आहेत, ज्यांचे आर्थिक वर्ष २०२४ च्या पहिल्या सहामाहीत राष्ट्रीय स्तरावरील वैयक्तिक ब्रँड विक्रीमध्ये अनुक्रमे २२ टक्के, ४८ टक्के, ३० टक्के, ३२ टक्के अणि ३५ टक्के योगदान आहे. टाटा पंच प्रांतामध्ये ब्रँडची सर्वाधिक विक्री होणारी सीएनजी मॉडेल ठरली, ज्यानंतर नेक्सॉन, अल्ट्रोज, टिगोर आणि टिएगोचा क्रमांक आहे. या आकडेवारींमधून टाटा मोटर्सचे शाश्वत वेईकल श्रेणीमधील नेतृत्व आणि नाविन्यपूर्ण व पर्यावरणपूरक गतीशीलता सोल्यूशन्स वितरित करण्याप्रती समर्पितता दिसून येते.

# सेतू सुविधा केंद्र चालकांकडून शासन नियमाची पायमल्ली, पावती न देताच अव्वाच्या सव्वा दर आकारून लूट

वाळूज महानगर, (प्रतिनिधी)- नागरिकांनी ऑनलाईन सुविधा मिळण्यासाठी शासनाने गावा-गावात सेतू सुविधा केंद्र चालविण्यासाठी दिलेले आहे परंतु गावा-गावातील सेतू सुविधा केंद्र चालक शासनाने विविध दाखल्यांसाठी ठरवून दिलेली रक्कम न स्वीकारता अव्वाच्या सव्वा दर आकारतात तसेच शुल्कापोटी घेतलेल्या रकमांची पावती न देता शासनाच्या नियमांची पायमल्ली करीत असल्याची तक्रार वडगाव येथील माहिती अधिकार कार्यकर्ते यशपाल कदम यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

शासनाने सर्वसामान्य नागरिकांना ऑनलाईन दाखले गावातच मिळावी यासाठी सेतू सुविधा केंद्र सुरू केलेले आहेत. त्यासाठी प्रत्येक दाखल्यासाठी २० रुपये महाऑनलाईन स्टॅम्पड्युटी १० रुपये व जीएसटी असे एकूण ३३.६० रुपये ठरवून दिलेले आहेत. तसेच प्रत्येक दाखला देताना नागरिकांना पावती देण्याबाबत नियम असतानाही सेतू सुविधा केंद्र चालक पावती तर देतच नाही उलट नागरिकांकाडून विविध प्रमाणपत्रासाठी वेगवेगळे दर आकारून लूट करीत आहेत. हे दर मुघलकी नियमाप्रमाणे असून, रहिवासी, उत्पन्न प्रमाणपत्रासाठी १३५ रुपये व जात प्रमाणपत्रासाठी ७०० ते १५०० रुपयांपर्यंत शुल्क आकारून शासन नियमांचे उल्लंघन करीत आहेत.

याबाबत माहिती अधिकार कार्यकर्ते यशपाल कदम यांनी जिल्हाधिकारी यांना तकार करत पायबंद घालण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. कदम यांनी तक्रारीत म्हटले आहे की , सर्व ऑनलाईन प्रमाणपत्र देणाऱ्या केंद्रचालक तथा सर्व सेतू सुविधा केंद्र चालक जास्तीचे शुल्क आकारणे, दर्शनी भागात शुल्क दराचे पोस्टर न चिटकावणे, प्रमाणपत्र देण्यासाठीचा कालावधी वाढवणे , एकच शुल्क निर्धारित केलेले असतांना ही वेगवेगळे दर आकारणे , पावती न देणे आदी नियमबाह्य पद्धतीने कामे करून गोरगरीब जनता व विद्यार्थ्यांची फसवणूक करत असल्याचे तकारीत म्हटले आहे.

# खुलताबाद गंगापूर विधानसभेचे आ. प्रशांत बंब यांच्या 10 लाखांच्या निधीतून मौजे शंकरपुरवाडी येथे सभागृहाचे भूमिपूजन



खुलताबाद प्रतिनिधी : भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे व माजी उपसभापती प्रकाश चव्हाण, राजु आवारे, द्वारकादास जाधव,सोशल मीडिया तालुकाध्यक्ष ओम जिते यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी सरपंच दादासाहेब जाधव, उपसरपंच गणेश अधाने ,गजानन साबळे, अंबादास दळे, सुरेश गोरे, दिनेश आढाव, संतोष पाडळे, मनोहर वाकळे, जावेद पठाण, सागर जाधव, महिला व गावकरी नागरिक उपस्थित होते

# मोटार वाहन निरीक्षकांचे तालुका स्तरावर शिबीर

अहिल्यानगर, दि.२ - जिल्ह्यातील शेवगाव, श्रीगोंदा, कर्जत, पाथर्डी, पारनेर व जामखेड या तालुक्यातील मोटार वाहन मालक व चालक यांच्या सोयीसाठी अहिल्यानगर प्रादेशिक परिवहन कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षक यांचे जानेवारी २०२५ ते जून २०२५ या कालावधीतील मासिक शिबिर वेळापत्रक जाहीर करण्यात आला असल्याची माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे यांनी दिली आहे.

शेवगाव व श्रीगोंदा तालुक्यात ७ व २१ जानेवारी २०२५, ४ व १८ फेब्रुवारी, ४ व १८ मार्च , ८ व २२ एप्रिल , ६ व २० मे आणि जून महिन्यात १० व २५ जून २०२५ रोजी शिबिराचे आयोजन करण्यात येईल.

कर्जत व पाथर्डी तालुक्यात ८ व २२ जानेवारी २०२५, ५ व १७ फेब्रुवारी, ५ व १९ मार्च, ९ व २३ एप्रिल, ७ व २१ मे आणि ११ व २५ जून २०२५ रोजी शिबिराचे आयोजन होईल.

पारनेर व जामखेड तालुक्यात ९ व २३ जानेवारी २०२५, ६ व २० फेब्रुवारी, ६ व २० मार्च, ११ व २४ एप्रिल, ८ व २२ मे आणि १२ व २६ जून २०२५ असे मासिक शिबिर वेळापत्रक आहे.

नियोजित मासिक दौऱ्याच्या दिनांकाच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी असेल किंवा शासकीय सुट्टी जाहीर होईल तसेच प्रशासकीय कारणास्तव दौरा रद्द झाल्यास त्या दिवसाच्या मासिक दौऱ्याचे कामकाज दुसऱ्या सोईस्कर दिवशी होईल व त्याची तारीख त्यावेळी जाहीर करण्यात येईल. अर्जदारांची अपूर्ण कागदपत्रे कोणत्याही परिस्थितीत स्विकारली जाणार नाहीत. शिबिराचे सर्व कामकाजाबाबत शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरणे बंधनकारक राहील. दौऱ्याच्या ठिकाणी परराज्यातून आलेली वाहने व बसेसची तपासणी केली जाणार नाही. ज्या तालुक्यात शिबिर आयोजित करण्यात आलेले आहे त्याच तालुक्यातील नागरिकांचे शिबिरामध्ये कामकाज करण्यात येईल. शिबिर कामकाज ठिकाणी तपासणी होणाऱ्या सर्व नवीन तात्पुरती नोंदणी झालेल्या परिवहनेत्तर संवर्गातील वाहनांचे डिस्क्लेमर असल्याशिवाय वाहनांची तपासणी करण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहनही श्री.सगरे यांनी केले आहे.

# मराठा रेजिमेंट सेंटर युनिट कोटा अग्नीवीर भरती

छत्रपती संभाजीनगर, दि.२(जिमाका):- मराठा लाईट इन्फंटरी सेंटर, शिवाजी स्टेडियम येथे अग्नीवीर जनरल ड्युटी व ट्रेडमॅन यांची भरती दि.२ जानेवारी ते ८ मार्च पर्यंत करण्यात येत आहे. उमेदवाराचे वय १७ वर्ष ६ महिने ते २१ वर्ष असावे. अधिक माहितीसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे संपर्क साधावा. इच्छुक माजी सैनिक पाल्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कार्यालय सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

## आयोडिनच्या गुणांमुळे उंचावले जीवनमान

मुंबई - १९८३ पासून टाटा सॉल्ट भारतातील आयोडिन कमतरतेच्या समस्येला तोंड देण्यात आघाडीवर आहे. व्हॅक्यूम-इव्हॅपोरेटेड आयोडिनयुक्त मीठ उपलब्ध करणारा पहिला ब्रँड या नात्याने टाटा सॉल्ट लाखो भारतीयांच्या घराघरात पोहोचले आहे. टाटा कन्झ्युमर प्रॉडक्ट्सच्या पॅकेज्ड फुड्स विभागाच्या अध्यक्ष दीपिका भान म्हणाल्या, 'टाटा सॉल्ट गेल्या कित्येक वर्षांपासून आयोडिन कमतरतेच्या समस्येचे निवारण करण्यासाठी आयोडिनचे योग्य प्रमाण असलेले मीठ पुरवण्यासाठी बांधील आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून आमचा ब्रँड लाखो भारतीयांचे स्वास्थ्य जपण्यासाठी दर्जेदार उत्पादने पुरवत आहे.'इंडिया आयोडिन सर्व्हे २०१८-१९ नुसार टाटा सॉल्टने आयोडिन डेफिशियन्सी डिसऑर्डरचे प्रमाण कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. २९ राज्ये आणि ७ केंद्रशासित प्रदेशांतील २१,४०६ घरांत करण्यात आलेल्या या सर्व्हेनुसार आयोडाइज्ड मिठाच्या वाढत्या वापरामुळे आयोडिनची कमतरता कमी झाली आहे. मात्र, या सर्व्हे नुसार राष्ट्रीय स्तरावर आयोडीनचे प्रमाण १५ पार्ट्स प्रति दशलक्ष (पीपीएम) समान किंवा त्याहून अधिक असलेले घरगुती कव्हरेज फक्त ७६.३ टक्के आहे. पंजाबमध्ये पुरेशा प्रमाणातील आयोडाइज्ड मिठाचे घरगुती कव्हरेज केवळ ८४.७ टक्के असून ६१.५ टक्के लोकांना आजही आयोडाइज्ड मिठाची माहिती नाही.

## 'आयडीएफसी फर्स्ट अकादमी' लॉँन्च

मुंबई: आईडीएफसी फर्स्ट बँकेला 'आयडीएफसी फर्स्ट अकादमी' लॉँन्च करण्याची घोषणा करताना अभिमान वाटतो, एक सर्वसमावेशक आर्थिक साक्षरता उपक्रम डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे उपलब्ध आहे. ही अकादमी बँकेच्या वित्तीय साक्षरता वाढविण्याचे ध्येय प्रतिबिंबित करते, ज्यामुळे व्यक्तींना त्यांच्या आर्थिक बाबी चांगल्या प्रकारे व्यवस्थापित करता येतात. आयडीएफसी फर्स्ट अकादमी क्लिष्ट आर्थिक विषयांचे अनुसरण करण्यास सोपे, जलद आणि प्रभावी शिक्षणासाठी तज्ञांनी डिझाइन केलेल्या सामग्रीसह सुलभ करते. यात विविध शिक्षण शैलींसाठी ब्लॉग, व्हिडिओ आणि परस्परसंवादी क्विझ आहेत. यात व्यावहारिक समज वाढवण्यासाठी वास्तविक-जगातील परिस्थिती-आधारित क्रिया देखील समाविष्ट आहेत. शेवटी, सहभागींचे शिक्षण ओळखण्यासाठी मान्यता कार्यक्रम देखील आहेत.

# श्री आजूबाई विद्यालयात तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धा संपन्न !

तभा वृत्तसेवा



कन्नड :- दि.०२ डिसेंबर - शहरातील श्री आजुबाई माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांची क्रिडा स्पर्धा संपन्न झाली आहे. नेहरू युवा केंद्र छत्रपती संभाजी नगर व शाश्वत बहुउद्देशीय सेवाभावी संस्था चापानेर यांच्या संयुक्त विद्यमाने सदर क्रिडा स्पर्धेचे आयोजन श्री आजूबाई माध्यमिक विद्यालयात आयोजित करण्यात आले होते,

या तालुकास्तरीय स्पर्धेत कबड्डी, खोखो, १०० मीटर धावणे, व गोळा फेक वयोगट १५ ते २९ या युवकांसाठी तालुकास्तरीय स्पर्धा घेण्यात आली होती, दि.३१ रोजी सकाळी १० वाजता स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी अध्यक्ष देवकर, शाश्वत सेवा संस्थेचे अतुल धाडबळे, तालुका क्रिडा मार्गदर्शक अविनाश काळे, कै. काशिनाथ पाटील क्रिडा शिक्षक म्हैसमाळे , लपांडव , श्री संत ज्ञानेश्वर चे क्रिडा शिक्षक, गोसावी , शाळेचे सर्व , तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी तालुक्यातील संत ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालय, कै. काशिनाथराव पाटील माध्यमिक विद्यालय, सूर्योदय माध्यमिक विद्यालय, कर्मवीर काकासाहेब देशमुख विद्यालय तसेच आजुबाई माध्यमिक विद्यालय येथील १७५ ते २०० विद्यार्थ्यांनी विविध खेळात सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या बक्षिस वितरणासाठी कन्नड शहर पोलीस निरीक्षक आर.वी. सानप उपस्थित होते. त्यांच्या हस्ते कबड्डी, खोखो, गोळा फेक, १०० मीटर धावणे, विविध खेळाची किट, स्मृतीचिन्ह, स्पर्धे चे प्रमाणपत्र, यासारखे बक्षीस वितरण करण्यात आले.राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला

## लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद

NAAC Accredited: B++ ता. धर्माबाद, जि. नांदेड ४३१८०९, फोन : ०२४६५ २४४१५८
संलग्न : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड. - 2 (f) & 12 (B) ने प्रमाणित

**ई-निविदा सन-2024-25**

मा. प्राचार्य लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड हे प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियान (PM-USHA) अंतर्गत महाविद्यालयात विविध कामे करणे करिता ई-निविदा बी- १ नमुन्यात अनुभवी व नोंदणीकृत कंत्राटदारांकडून निविदा ऑनलाइन पद्धतीने मागविण्यात येत आहेत, निविदेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या वेबसाइटवर पाहण्यास उपलब्ध आहेत.

**कामाचे नाव**
**1) 5 ICT वर्ग खोल्याचे बांधकाम**
**2) मुलांचे वस्तीगृहाचे बांधकाम**
**ई- निविदा प्रसिद्धीचा तपशील**
ऑनलाइन निविदा विक्री व दि. 01/01/2025 11.00 ते स्वीकृत दिनांक : 22/01/2025 17.00 निविदापूर्व बैठक : दि. 15/01/2025 11.00 ऑनलाइन निविदा उघडणे दिनांक: दि. 24/01/2025 11.00 पर्यंत

**कामाचे नाव**
**1) मुलींच्या वस्तीगृहाचे नूतनीकरण**
**2) सांस्कृतिक सभागृहाचे नूतनीकरण**
**3) व्यायाम शाळेचे नूतनीकरण**
**ई- निविदा प्रसिद्धीचा तपशील**
ऑनलाइन निविदा विक्री व दि. 02/01/2025 11.00 ते स्वीकृत दिनांक : 16/01/2025 17.00 ऑनलाइन निविदा उघडणे दिनांक: दि. 17/01/2025 11.00 पर्यंत

स्वाक्षरित /
**प्राचार्य**
लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड

## सोनी सबवरील 'तेनाली रामा' मालिकेत तेनालीचे भूत

सोनी सबवरील 'तेनाली रामा' मालिकेत दरबारी कवी आणि हजरजवाबी तेनाली रामा (कृष्ण भारद्वाज)च्या सुरस रम्य कथा सांगितल्या आहेत. पूर्वी विजयनगरमधून हकालपट्टी करण्यात आलेला तेनाली अलीकडच्या भागांमध्ये पुन्हा विजयनगर साम्राज्यात येऊन पोहोचला आहे आणि रात्र घालवण्यासाठी एका योग्य जागेच्या शोधात आहे.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी कन्नड**
**तहसिल कार्यालय कन्नड जि. औरंगाबाद**
**फोन:-०२४३५-२२१०२४**
जा.क्र .२०२४/जमा-२./कु ळ/ कावी-११६३ दिनांक २७.१२.२०२४

## जाहिर प्रगटन

सर्व ग्रामस्थ मौजे कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर यांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री साधना संतोष ठोले रा सुवर्णपालेश्वर कॉलनी कन्नड ता कन्नड.जि. छत्रपती संभाजीनगर यांनी मौजे कन्नड येथील गट नं १९४/३ मध्ये क्षेत्र ०.४०आर शेत कुळ जमिन मधील भोगवटादार वर्ग-२ जमिनीची विक्री परवानगी मिळणे बाबत या कार्यालयास अर्ज देवून विनंती केलेली आहे.

करिता ज्या कोणास या बाबत आक्षेप असल्यास त्यांनी लेखी पुराव्यासह हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत या कार्यालयास आक्षेप दाखल करावे. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी,

**- तहसिलदार, कन्नड**

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र.५९५/२०२४

अर्जदार : १) मंदाबाई भ्र. रामनाथ गवळी, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम, रा. संजिवनी हॉस्पीटल, प्रगती कॉलनी गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) योगेश पि. रामनाथ गवळी, वय ४३ वर्षे, धंदा वैद्यकीय व्यवसाय, रा. संजिवनी हॉस्पीटल, प्रगती कॉलनी गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) शितल भ्र. विवेकनंदा राजळे, वय ४५ वर्षे धंदा घरकाम, रा. कासार पिंपळगाव ता. पाथर्डी जि. अहमदनगर ४) अपुर्वा पि. रामनाथ गवळी, वय २५ वर्षे, धंदा शिक्षण, रा. संजिवनी हॉस्पीटल, प्रगती कॉलनी गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार क्र. १ ते ३ यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. के. आर. कन्हाळे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.२ ते ४ ह्या आपसात नात्याने सख्खे बहिण व भाऊ असुन अर्जदार क्र.१ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील नामे रामनाथ तुकाराम गवळी मौजे गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते ते दिनांक ०७/०५/२०२४ रोजी मौजे गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत रामनाथ तुकाराम गवळी यांना अर्जदार क्र.१ ते ४ हे कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयत रामनाथ तुकाराम गवळी यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसुन अर्जदारांना मयताचे मृत्युपश्चात शासकीय व निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २४/१२/२०२४ रोजी दिले. ०१/०१/२०२५

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**
**जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/ जन्म-मृत्यु नोंद/ सिआर-७४२**
**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक १९/१२/२०२४**

अर्जदार : सुभाष काळू चव्हाण रा मोहर्डा ता कन्नड जि छ संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय रिष्ठ्ठी मोर्डा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगा करण सुभाष चव्हाणच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल के ला आहे की, अर्जदार यांच्या मुलगा करण सुभाष चव्हाणचा जन्म दिनांक २७-०६-२०११ रोजी रिठ्ठी मोहर्डा ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगा करण सुभाष चव्हाणचा जन्म दिनांक २७-०६-२०११ रोजी रिष्ठ्ठी मोर्डा ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलगा करण सुभाष चव्हाणचा जन्म दिनांक २७-०६-२०११ रोजी रिष्ठ्ठी मोहर्डा येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १४-०१-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक २७-०६-२०११ रोजी रिठ्ठी मोहर्डा येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीत नंतर आलेला उजर/आक्षेप ग्राह्य धरलाजाणार नाही.

करिता दिनांक १९/१२/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

विशेशष ध.आ./मु.सा.वि./१९.म
जा.क्र.जे-३/६४०३/२०२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर.
दिनांक :१८/१२/२४

NOTICE OF INQUIRY
(FORM NO.2)
(नगुना क्रमांक-२)

**सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर,**

## चौकशी जाहिर नोटीस

**(सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, सन १९५० याचे कलम १९/२२/२८)**
**सन २०२३ चा अर्ज क्रमांक जे-३/८०/२०२३ कलम ४१ अ.**

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था :- श्री दत्त चॅरिटेबल ट्रस्ट, आदित्य नगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

नोंदणी क्रमांक- ई/९२५/ (औ.) श्री. राधाकिसन आसाराम जाधव व इतर ०२

यास ज्या अर्थी मा. सहायक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांजकडून वरील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेसंबंधात कलम ४१ अ. अन्वये निवडणूकीबाबतचे निर्देश करण्यासाठी चौकशी करण्यात येणार आहे. तचेस खालीलप्रमाणे गैरअर्जदार यांना रजिष्टर पोष्टाने नोटिस पाठविण्यात आल्या होत्या परंतु पत्ता अपूर्ण असल्यामुळे रजिष्टर पोष्टाचे पाकिट परत आलेले आहेत. गैरअर्जदार पुढील प्रमाणे :-

१) श्री. विलास बापुराव आवटी रा. काबरा नगर, सुतगिरणी, गारखेडा परिसर, औरंगाबाद.
२) श्री. अमोल सुभाष राव देशमुख रा. आदित्य नगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

त्याअर्थी तुम्हास ही नोटीस देण्यात येत आहे आणि फर्माविण्यात येत आहे की, तुम्ही जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधीमार्फत किंवा योग्य रीतीने सूचना दिलेल्या वकीलामार्फत, मा. सहायक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे समोर वर दिलेल्या पत्यावर तारीख ०६/०१/२०२४ रोजी सकाळी ११ वाजता वरील बार्बीचा अखेरचा निकाल करण्यासाठी ठरविलेल्या सुनावणीस हजर रहावे. आणि चौशीसंबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि त्यासंबंधीचा तोडी व दस्तऐवजांच्या रुपातील सर्व पुरावा सादर करावा.

वर निर्दिष्ट केलेल्या जागी व वेळी हजर राहण्यास तुम्ही कसुर केल्यास तुमच्या गैरहजेरीत सदरहू चौकशी होईल, तिचे कामकाज चालविण्यात येईल आणि तिचा निकाल करण्यात येईल अशी तुम्हास नोटीस देण्यात येत आहे.

आज दिनांक १७/१२/२०२४ शिक्क्यानिशी रोजी माझ्या सहीनिशी व सहायक धर्मादाय आयुक्तांच्या शिक्क्यानिशी दिली.

**(प्र) अधिक्षक न्यायशाखा**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर**

## अग्रलेख...

# अभिलाषावृद्धीची स्पॅडेक्स मोहीम

इस्रो अर्थात भारताची अंतराळ संशोधन संस्था दिवसाकाठी भारताच्या शिरपेचात एकाहून एक सरस अशी यशाची पिसे खोवत चालली आहे. एकामागून एक प्रयोग आणि उपग्रह प्रक्षेपण मोहिमा यशस्वी करणाऱ्या इस्रोने अंतराळ संशोधन क्षेत्रात भारताला प्रगत देशांच्या मांदियाळीत नेऊन बसविले आहे. इस्रोचे सारे नियोजित प्रयोग यशस्वी ठरत असून, या संस्थेने बजावलेल्या मोहिमा अतिप्रगत आणि जगाला आव्हान देणाऱ्या ठरत आहेत. इस्रोने ३० डिसेंबरला रात्री स्पॅडेक्स मोहिमेचे यशस्वी प्रक्षेपण करून, अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रात इतिहास घडविला. विश्वसनीय ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपकावरून स्पॅडेक्स ही स्पेस डॉकिंग मोहीम प्रक्षेपित करण्यात इस्रोने यश मिळविले. आजवर केवळ अमेरिका, रशिया आणि चीनलाच अवगत असलेले हे तंत्रज्ञान आत्मसात करून भारताने या प्रगत देशांशी बरोबरी साधली आहे. इस्रोच्या अध्यक्षांनी तर या कामगिरीचे 'मैलाचा दगड' म्हणून कौतुक केले आहे. आजवर चित्रपट रसिकांनी अंतराळ संशोधनावर आधारित हॉलिवूडच्या इंटरस्टेलर चित्रपटामध्येच डॉकिंग सिस्टिम कशी काम करते, याचा अनुभव घेतला होता. आता प्रत्यक्ष डॉकिंग सिस्टिमच आपल्या संशोधनाचा भाग बनवून भारताने प्रगतिशील देशांसोबतच अग्रगत देशांच्या मनात तंत्रज्ञानाबाबत इच्छा, आकांक्षा जागविल्या आहेत. अंतराळात एका यानातून दुसऱ्या यानात प्रवेश करण्यासाठी या सिस्टिमचा उपयोग केला जातो. अंतराळ मोहिमा वाढल्याने भविष्यात ही सिस्टिम मोलाची ठरणार आहे. काळाची पावले ओळखून इस्रोने हे मोठे पाऊल उचलले आहे. श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून प्रक्षेपित करण्यात आलेले स्पॅडेक्स अंतराळयान निर्धारित कक्षेत पोहोचले असून, आता इस्रोची नजर डॉकिंग आणि अनडॉकिंगच्या प्रयोगावर केंद्रित झाली आहे. अंतराळात एका अंतराळयानाला दुसरे अंतराळयान जोडण्याला 'डॉकिंग', तर जोडलेले दोन अंतराळ यान वेगळे होण्याला 'अनडॉकिंग' म्हणतात. या मोहिमेअंतर्गत अंतराळ यानाला 'डॉक' आणि 'अनडॉक' करण्याच्या भारताच्या क्षमतेची चाचणी होणार आहे. अंतराळात ज्यावेळी एखादी मोहीम पार पाडण्यासाठी अनेक रॉकेट प्रक्षेपित करणे आवश्यक असते, त्यावेळी 'इन-स्पेस डॉकिंग' तंत्रज्ञानही आवश्यक असते. त्यानुसार स्पॅडेक्स मिशन अंतर्गत अंतराळात पाठवलेल्या दोन उपग्रहांपैकी चेझर आणि लक्ष्य हे पृथ्वीभोवती २८ हजार ८०० किलोमीटर वेगाने प्रदक्षिणा घालणार आहेत. दोन्ही एकाच कक्षेत एकाच गतीने बसवले जातील. आकाशात एका विमानातून दुसऱ्या विमानात इंधन भरण्याची प्रक्रिया भारताला अवगत आहे. मात्र विमानांचा वेग ताशी ७०० ते ८०० किलोमीटर असतो. दोन विमानांमधील इंधन भरण्याची प्रक्रिया स्वयंचलित यंत्रणेद्वारे संचालित केली जाते. पण डॉकिंक तंत्रज्ञान अतिशय जटिल आणि आव्हानात्मक असून, याअंतर्गत ताशी २८ हजार ८०० किलोमीटर वेगाने जाणारे उपग्रह जोडावे लागणार आहेत. ही आव्हानात्मक प्रक्रिया सात दिवसांत पूर्ण होणे अपेक्षित आहे. त्यासाठी ७ जानेवारी ही तारीख निर्धारित करण्यात आली असून, इस्रोच्या साऱ्या चमूचे त्याकडे लक्ष लागले आहे.

चांद्रयान-४ आणि भविष्यातील भारतीय अंतराळ स्थानकासारख्या दीर्घकालीन मोहिमांसाठी डॉकिंग तंत्रज्ञान मोलाचे ठरणार आहे. सोबतच गगनयान मोहिमेसाठी देखील हे तंत्रज्ञान महत्त्वपूर्ण मानले जात आहे. हे तंत्रज्ञान स्पेस रोबोटिक्ससारख्या भविष्यातील प्रयोगांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे. भारतासाठी हा दिवस अभिमानाचा ठरला असला तरी यामागे राजकीय इच्छाशक्तीदेखील महत्त्वाची ठरली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या १० वर्षांत उचललेली पावले आणि शास्त्रज्ञांना धीर देण्याच्या त्यांच्या भूमिकेमुळे आजचा दिवस उजाडला आहे. इस्रोच्या अनेक मोहिमांचे पंतप्रधान स्वतः साक्षीदार ठरले आहेत. विदेशात असले तरी ते इस्रोच्या मोहिमांवर जातीने लक्ष ठेवून असतात, याचा अनुभव भारतीयांनी घेतला आहे. त्यांचे शब्द शास्त्रज्ञांसाठी मंत्राचे काम करीत असतात. जय जवानचा नारा देऊन ते थांबत नाहीत. दर वर्षी दिवाळीला सीमेवर जाऊन ते लष्करी जवानांच्या आनंदात सहभागी होतात. जय किसान हा त्यांचा नारा शेतकऱ्यांच्या जनकल्याणासाठीचा आहे. देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांना त्यांच्या नेतृत्वाखालील सरकार याच मंत्रजपापोटी महिन्यावारी धान्य आणि किसान सन्मान निधी देत आहेत आणि आता त्यांनी जय विज्ञानचाही मंत्रघोष केला असून, त्याद्वारे देशातील शास्त्रज्ञांचे मनोबल वाढविले आहे. चांद्रयान-२ मोहीम अपयशी ठरल्यानंतर मोदींनी इस्रो प्रमुखांची पाठ थोपटून जी सांत्वना दिली, ती साऱ्या जगाने बघितली. त्यातून भारतीय शास्त्रज्ञांचा उत्साह वाढला आणि नवसंकल्पना यशस्वी करण्याची मालिकाच उभी झाली. यात महिला शास्त्रज्ञांचीही भूमिका महत्त्वाची ठरली.

१९६२ साली डॉ. विक्रम साराभाई यांच्या अध्यक्षतेत जेव्हा इस्रोची स्थापना झाली, तेव्हा त्यांच्याकडे मोजक्याच शास्त्रज्ञांची चमू होती आणि संस्थेला पुरेसे आर्थिक पाठबळही नव्हते. भारताने पहिला उपग्रह जेव्हा प्रक्षेपित केला तेव्हा लॉंचिंग पॅडपर्यंत त्याचे पार्ट्स सायकलवरून न्यावे लागले होते, याची छायाचित्रे आपण साऱ्यांनी बघितली आहेत. पण तेव्हाचा आणि आजचा जमाना यात बरेच अंतर आहे. आज आपण चंद्रावर आणि मंगळावर जाण्याच्या मोहिमा आखत आहोत. इस्रोने तर व्यावसायिकदृष्ट्या मोठी कमाई करून देशाच्या अर्थव्यवस्थेत हातभार लावला आहे. इस्रोने युरोप आणि अमेरिकेच्या अंतराळ मोहिमांद्वारे सुमारे ४२७ दशलक्ष डॉलर्स कमाविले आहेत. भारतीय रुपयात याची किंमत ३६०० कोटी असल्याचा खुलासा केंद्रीय अंतराळ राज्यमंत्री जितेंद्र सिंग यांनी केला आहे. इस्रोचे हे व्यावसायिक उड्डाण भारताला येत्या काळात आणखी मोठा महसूल मिळवून देणार आहे. इस्रो २०२५ च्या पहिल्या सहामाहीत पाच व्यावसायिक प्रक्षेपण करणार आहे. श्रीहरिकोटा येथून प्रक्षेपित केलेली पीएसएलव्ही-६० ही इस्रोची ९९ वी मोहीम होती. याच महिन्यात १०० व्या मोहिमेचा टप्पा इस्रोने गाठलेला दिसू शकतो. त्यादृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. आजवर चंद्रावर कोणीही मालकी हक्क सांगितलेला नाही. भारताच्या स्पॅडेक्स मोहिमेकडे २०४० पर्यंत मानवाला चंद्रावर उतरवण्याच्या दृष्टीने टाकलेले बळकट पाऊल म्हणून पाहिले जात आहे. स्पॅडेक्स या डॉकिंग यंत्रणेला इंडियन डॉकिंग सिस्टिम असे नाव देण्यात आले आहे. इस्रोने या प्रणालीचे पेटेंटही घेतले आहे. आतापर्यंत कोणत्याही देशाच्या अंतराळ संशोधन संस्थेने या अत्यंत गुंतागुंतीच्या प्रक्रियेचा तपशील जाहीर न केल्यामुळे भारताने आपली स्वतःची डॉकिंग यंत्रणा विकसित केली आहे. या मिशनपुढे आव्हानेही आहेत. सर्वांत मोठे आव्हान दोन उपग्रहांना पृथ्वीच्या कक्षेत मिलिमीटर स्तराच्या अचूकतेसोबत जोडण्याचे आहे. नजीकच्या काळात दोन्ही उपग्रहांदरम्यान संचार आणि नेव्हिगेशन डाटाचे आदानप्रदान सुरळीतपणे कसे होईल, यावर जिकिरीने काम करावे लागणार आहे. ऑटोमॅटिक डॉकिंगसाठी अत्याधुनिक सॉफ्टवेअर आणि हार्डवेअरची आवश्यकता इस्रो कशी पूर्ण करते, हेदेखील बघावे लागणार आहे. १९६३ मध्ये इस्रोने पहिल्या रॉकेटचे प्रक्षेपण केले होते. आर्यभट्ट हा भारताचा पहिला उपग्रह १९७५ साली प्रक्षेपित झाला होता. त्यानंतर भारताने एसएलव्ही-३ हे भारतीय बनावटीचे पहिले रॉकेट विकसित केले. पीएसएलव्ही, जीएसएलव्ही, चांद्रयान-१, मंगळयान, चांद्रयान-२ या मोहिमांचा प्रवास भारतीयांसाठी स्वप्नवत आहे. आपल्याला अवकाश तंत्रज्ञानासाठी दारोदार भटकण्याचा काळ आता गेला आहे. आता आपणच विकसनशील देशांसाठीच नव्हे तर विकसित देशांसाठीही तारणहार ठरत आहोत. तिसरे जग तर भारतीय अंतराळ तंत्रज्ञानावर फिदा आहे. भूकंप, वादळे, पूर, हवामानातील चढ-उतार आदी नैसर्गिक आपत्तींच्या पूर्वनिर्धारणात तिसऱ्या जगाला भारताची मोठी मदत होत आहे. भारताची मदत देशाला गुलामीत ढकलणारी नसते, त्याची फारशी किंमत चुकवावी लागत नाही, हे सर्वमान्य झाल्यानेही शेजारी देश इस्रोकडे आशेने बघत आहेत. स्पॅडेक्स मोहिमेच्या निमित्ताने त्यांच्या अभिलाषांची पूर्ती करण्याचे सामर्थ्य इस्रोला निश्चित प्राप्त होईल, ही खात्री आहे.

## इतस्ततः

**डॉ. विवेक राजे**

# भोळसट दिशाभूल...

आटपाट नगर होते. तिथे तथाकथित लोकशाही पद्धती होती. लोक, आपल्यावर राज्य कोणी करावे हे तिथे ठरवत असत. त्यासाठी तिथे म्हणे जनतेचे मत विचारात घेतले जात असे. एकदा जनतेला कोणी राज्य करावे हे नीट ठरवता आले नाही. त्याचा फायदा घेत त्या देशातील सर्वांत श्रीमंत अशा राजकारण करणाऱ्या महिलेला अचानक आतला आवाज ऐकू आला. आणि कुणाच्याही ध्यानीमनी नसलेल्या पण त्या श्रीमंत महिलेशी व तिच्या घराशी एकनिष्ठ असलेल्या एका अधू दृष्टीच्या माणसाला राजा केले गेले. आता सिंहासनावर बसल्यानंतर तरी हा दृष्टिहीन मिळमिळीत माणूस अंगी अवसान आणून त्याची आधीची कारकीर्द पाहून, काही चांगले काम करेल अशी भोळ्याभाबड्या जनतेची अपेक्षा होती. पण राजा म्हणून वा नेता म्हणून कोणतेच गुण नसलेल्या, मात्र जनतेच्या भोळसटपणाचा फायदा घेत पुन्हा पुन्हा तिला जाणीवपूर्वक तयार केलेल्या आपल्या खोट्या प्रतिमेच्या आधारावर फसवण्यात नव्या राजाचे कौशल्य वादातीत होते. त्याच आधारावर आणि एका परिवाराच्या पायाशी वाहिलेल्या निष्ठांमुळे त्याने या आधी देखील अनेक महत्त्वाच्या पदांवर आपली वर्णी लावून घेतली होती. आता नवा राजा, जो श्रीमंत महिलेच्या हातातील खेळणे होता, कारभार करू लागला. या नगरात सुनियोजितपणे तयार करण्यात आलेली इको-सिस्टिम, त्याची भलावण करून आपले उखळ पांढरे करून घेऊ लागली. सामान्य जनतेच्या आकलनाबाहेर असलेल्या कोणा एका शास्त्रातील त्यांच्या मोठ्या ज्ञानाचे आणि अधिकाराचे कौतुक केले जाऊ लागले. जनता, राजा आणि ती श्रीमंत महिला सगळेच सुखी झाले.

इतर नगरांमध्ये आपल्या नगराच्या हेरांचे जाळे प्रत्येकच राजा विणत असतो. तसेच जाळे या नगराने देखील विविध नगरांमध्ये तयार करण्यात यश मिळविले होते. यात त्याच्या आधीच्या राजांचे मोठे योगदान होते. अचानक एका देशी या नगराच्या असलेल्या हेरांच्या जाळ्याबद्दलची माहिती त्या देशीच्या संरक्षण यंत्रणेला देण्यात आली. आणि त्या नगराने आपल्या प्रदेशातील ते जाळे लागलीच उद्ध्वस्त केले. अनेक हेरांना ठार केले गेले, काही तुरुंगात डांबले गेले तर काही परागंदा झाले. आपल्या राजाच्या नगराच्या हेरगिरी संस्थेने चौकशी केली असता ही माहिती उघडकीस आणण्यात, आपल्याच नगराच्या तेथील राजदूताचा हात असल्याचे लक्षात आले. तसे अहवाल तोंडी पद्धतीने राजाला देण्यात आले. आता यावर खरं म्हणजे देशद्रोहाचा आरोप, अटक आणि खटला चालायला हवा होता. गादीवर बसवलेला या मिळमिळीत राजाने देश, राष्ट्र म्हणून काहीही विचार न करता उलट त्या राजदूतालाच बढती देऊन नगराचा उपाध्यक्ष केले. थोडे दिवस नगरातील लोकांनी ओरडाआरड केली. पण जनप्रतिनिधिगृहात असलेल्या बहुमताच्या आधारावर आणि स्वच्छ प्रतिमेच्या जोरावर राजाची वेळ निभावली गेली. जनता लवकरच सगळे विसरून गेली. उपाध्यक्ष झालेला हा राजदूत शत्रुराष्ट्राचा हेर असल्याचे आरोप पुढेही होत राहिले. राजाने मात्र राष्ट्रहिताचा विचार न करता मौन धारण करणेच श्रेयस्कर मानले.

काळ उलटत गेला. तिसऱ्याच एका नगरात आयोजित केलेल्या एका बैठकीसाठी राजाला आमंत्रित केले गेले. तेथे शेजारी पण शत्रू नगरीचा मुख्य प्रधान येणार होता. राजाने त्या प्रधानाबरोबर द्विपक्षीय वाटाघाटी, चर्चा आणि द्विपक्षीय समझोता असा कार्यक्रम आखला. बंद दाराआड राजाने त्या नगराच्या प्रधानाशी बोलणी केली. त्या नंतर दोघांनी एकत्र पत्रकार परिषद घेतली. त्यात या राजाने पत्रकारांना आम्ही एकमेकांच्या नगरांत कारवाया करायच्या नाहीत असे ठरविले आहे असे सांगून टाकले. एका पत्रकाराने त्यावर प्रश्न विचारला की, याचा अर्थ तुम्ही आमच्या नगरात या आधी कारवाया करीत होतात असा घ्यायचा का, त्यावर राजा नेहमीप्रमाणे मौनात गेला. एकप्रकारे या आधी आपण शेजारी नगरात कारवाया करीत होतो अशीच ही कबुली होती. काही नगरभक्तांनी राजाच्या वक्तव्यावर आणि मौनावर टीकेची झोड उठवली, परंतु श्रीमंत महिला आणि तिच्या कुटुंबाच्या पाठिंब्यावर राजा गादीवर टिकून राहिला. मग या राजाला नगरातले लोक मौनीबाबा म्हणू लागले. राजात काही दम नाही हे त्याच्या आगेमागे झुलणाऱ्या साथीदारांच्या एव्हाना लक्षात आले होते. मग ज्याच्या हाती जे लागेल ते तो साथीदार हडप करू लागला. कर्तृत्वहीन, निष्क्रिय राजा मग सगळ्या घोटाळ्यांकडे दुर्लक्ष करू लागला. त्याला काही झाले तरी खुर्चीची ऊब सोडायची नव्हती.

मग त्या नगरात एकामागोमाग एक घोटाळे उघडकीस येऊ लागले. कोळसा, जमीन, हाऊसिंग बॉण्ड, चिट फंड, अशा विविध क्षेत्रांत घोटाळे आणि संपत्ती हडप करणे नगरात सुरू झाले. याच काळात राजाने एक मोठी खेळांची स्पर्धा नगरात घेण्याचे ठरविले. या खेळांच्या आयोजनात देखील प्रचंड मोठा घोटाळा आणि आर्थिक अफरातफर उघडकीस आली. राजा श्रीमंत महिलेचा आणि घराण्याचा कृतज्ञ राहण्याच्या प्रयत्नात सर्वसामान्य जनतेशी कृतघ्न होत गेला. श्रीमंत महिला आणि कुटुंबाप्रति असलेल्या आपल्या निष्ठा दाखवण्याच्या प्रयत्नात राजा म्हणून आपल्या असलेल्या कर्तव्यांकडे आणि अधिकारांकडे पाठ करून, फक्त स्वतःला निष्कलंक राखण्यासाठी मग रेनकोट घालून बाथरूममध्ये शिरणाऱ्या माणसासारखा या साठमारीत गुंतलेल्या लोकांमध्य अंग चोरून वावरू लागला. त्याच वेळी सहजपणे लोकांच्या डोळ्यात येणार नाही अशा प्रकारे विविध फायदे तो स्वतःसाठी आणि आपल्या कुटुंबीयांसाठी न चुकता घेत राहिला.

त्यातच एकदा राजकारणातील गुन्हेगारी नियंत्रित करण्यासाठी राजा आणि त्याच्या मंत्रिमंडळाने आणलेला अध्यादेश श्रीमंत महिलेच्या लाडक्या मुलाने भर सभेत, हजारो लोक, पत्रकार व टीव्हीसमोर फाडून टाकला. लोकांना वाटलं राजा यावर योग्य ती कारवाई करेल. कारण हा संपूर्ण व्यवस्थेचा जाहीर अपमान आहे. पण राजा निमूटपणे, काहीही न करता आपल्या ऊबदार खुर्चीत बसून होता. आता जनता राजाच्या राजेपणाकडे एक अपघात म्हणून पाहू लागली. काही लोकांना त्याच्या कोडगेपणाचे आश्चर्य वाटू लागले. याच काळात नगरात ठिकठिकाणी बॉम्बस्फोट होत होते. निष्पाप नागरिकांचे हकनाक जीव जात होते. संरक्षण व्यवस्था खिळखिळी झाली होती. पण राजा पांढरे कपडे घालून मौन होता. हे सगळे घडत असताना नगराच्या सैन्याने देश संरक्षणासाठी राजाकडे मागितलेले आधुनिक युद्ध साहित्य तर सोडाच, सीमेवर आणि सीमेच्या आत लढणाऱ्या सैनिकांना बुलेटप्रूफ जॅकेट देखील एवढ्या तज्ज्ञ, अभ्यासू, विद्वान, सुसंस्कृत राजाने दिली नाही. काहीही चांगले करण्याची अथवा राजसिंहासनाची ऊब सोडण्याची देखील मानसिकता राजाने कधी दाखविली नाही. शेवटी नगराची जनता कंटाळली आणि पहिली संधी मिळताच तिने राजा, त्याची विचारधारा, आतला आवाजवाली श्रीमंत महिला यांना बाजूला सारले. नव्या कर्तृत्ववान, कर्तव्यदक्ष, धाडसी, नव्या विचारधारेच्या माणसाला लोकशाही मार्गाने राजसिंहासनावर बसवले. जुना राजा तेव्हा बाजूला झाला. नव्या राजाची धडाडी, निर्णयक्षमता याचे त्याने एकदोनदा, श्रीमंत महिलेला घाबरत घाबरत कौतुक केले. पण घेतलेले मौन व्रत आणि नाकर्तेपणा मात्र सोडला नाही. आता राजा जनतेच्या विस्मृतीत गेला होता. एक दिवस राजा मृत्यू पावला. अनेक लोक राजाला लागलीच मितभाषी, सुसंस्कृत, अभ्यासू, विद्वान म्हणून पुन्हा गौरवण्यात मग्न झाले. निर्भीड, निःस्पृहपणे राजाच्या आयुष्याचे विश्लेषण केले तर राजाने नगराची सेवा कधी केलीच नाही, केलीच असेल तर त्या श्रीमंत महिलेची आणि तिच्या परिवाराची केली असंच म्हणावं लागेल. 'मरणान्तानि वैराणि' म्हणत राष्ट्राची मौल्यवान अशी दहा वर्षे वाया घालवणाऱ्या माणसाचे मृत्युपश्चात कौतुक करणे याला त्या नगरातील जनतेचा भोळसटपणा मानावा की मूर्खपणा हा प्रश्नच आहे.

९८८१२४२२२४

## वेध

**हेमंत सालोडकर**

# नव्या वर्षात देशापुढील आव्हाने आणि संधी

नवीन वर्षाचा दुसरा दिवस उजाडला आहे. सरत्या वर्षाला निरोप आणि येणाऱ्या वर्षाचा स्वागत सोहळा मोठ्या थाटामाटात पार पडला. नवीन वर्षही मागील अनेक वर्षांप्रमाणे इतिहासजमा होईल. पण येणारा प्रत्येक दिवस हा प्रत्येक व्यक्ती, कुटुंब, समाज, गाव, शहर, जिल्हा, राज्य आणि देशासाठी काहीतरी नवीन आव्हान आणि संधी घेऊन येत असतो. काही जण यातून धडा घेतात तर काही जण हे नेहमीचेच आहे, असे म्हणून दुर्लक्ष करतात. यातून जे खरोखर शिकतात ते नक्कीच प्रगती आणि विकासाच्या मार्गावर अग्रेसर होतात आणि जे दुर्लक्ष करतात त्यांची वाट तेथेच अवरुद्ध होते.

आपण काहीतरी नवीन शिकले पाहिजे, इतरांच्या बरोबरीने राहिले पाहिजे असा विचार करणारे समाजासोबत मार्गक्रमण करत असतात. ज्यांना 'देगा हरी पलंगावरी'ची सवय असते ते एकाच ठिकाणी चिकटून बसतात. आज भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली. या साडेसात दशकात भारताने अनेक आव्हाने लीलया पेलली आणि काही आव्हानांचे संधीत रूपांतर केले. त्यातही विजयश्री मिळवली आहे. आज भारत जगात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेपैकी एक आहे. सर्व जगाचे लक्ष भारताकडे लागले आहे. भारत काय करतो, कोणत्या क्षेत्रात मुसंडी मारतो याकडे जवळपास संपूर्ण जग बघत असते. अशी स्थिती खरोखरंच काही वर्षांपूर्वी होती का, याचा विचार केला तर त्याचे उत्तर 'नाही' असेच मिळेल. भारताने आज पृथ्वी ते आकाश, समुद्र ते अंतरिक्ष, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, ज्ञान-तंत्रज्ञान, विज्ञान, कृषी अशा सर्वच क्षेत्रांत नेत्रदीपक कामगिरी केली आहे. असे असले तरी अजून बराच पल्ला गाठायचा आहे. रोज नवीन आव्हाने आणि नवीन संधी आपल्यापुढे असतात. अंतर्गत बाबींसोबत जागतिक पटलावर काय सुरू आहे, याकडेही भारताची नजर असते. देशाला लाभलेले नेतृत्व कसे आहे, त्याची दूरदृष्टी कशी आहे, तसेच पुढील



कितीतरी वर्षांचा अंदाज बांधून त्यावर काम करणारे नेतृत्व लाभल्यामुळेच आज भारताचा डंका जागतिक स्तरावर वाजत आहे. आज भारत पायाभूत सुविधा, रस्ते, सौर ऊर्जा या क्षेत्रात आघाडीवर आहे. प्रत्येक घरावर सोलर पॅनेल दिसत आहे. अशा दूरदृष्टीचा विचार यापूर्वी कोणीच केला नव्हता. त्यावेळीही सूर्य होता, त्यापासून मिळणारे लाभही घेता येऊ शकत होते, पण त्यासाठी लाभणारी दृष्टी कोणाकडेच नव्हती. आता सौर ऊर्जेचा उपयोग शेतकरी, कष्टकरी ते कामकरी सर्वांना होत आहे. ही सर्व अनुकूल स्थिती असली तरी भारतात गरिबी आणि उत्पन्न असमानता ही गंभीर समस्या आहेत. देशात दारिद्र्यरेषेखाली राहणारी लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे. श्रीमंत आणि गरीब यांच्यात मोठी दरी आहे. ही दरी सामाजिक एकता आणि समावेशक विकासाला आव्हाने निर्माण करते. मागील काही वर्षांपासून अनेक तरुणांना स्टार्टअप, मुद्रा लोन यासारख्या योजनांमुळे हाताला काम मिळू लागले आहे. काही युवक तर इतरांना रोजगार देत आहेत. त्यामुळे अनेकांच्या पोटाचा प्रश्न मिटला आहे. पण अशा युवकांची संख्या फार कमी आहे. आजही अनेक युवा बेरोजगार आहे. त्यांच्या हाताला काम नसल्यामुळे त्यांची डोकी भडकवून त्यांना वाईट मार्गाकडे वळवण्याचा प्रयत्न देशविरोधी लोक करतात. त्यांना पैशाचे आमिष दाखवून कोणत्याही आंदोलन उभे केले जाते. पहिले घोषणाबाजी, नारेबाजी, नंतर दगडफेक, जाळपोळ अशा हिंसक कृत्यासाठी त्यांचा उपयोग केला जातो. हे टाळण्यासाठी हाताला काम, पोटात अन्न या दोन गोष्टींकडे सरकारला लक्ष द्यावे लागेल. भ्रष्टाचार आणि लालफीतशाही यावर लगाम कसावा लागेल. आज दवाखान्याचा खर्च सामान्य लोकांच्या आवाक्याबाहेर झाला असताना, आरोग्यसेवेवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे.

आधुनिकता आणि विदेशीची सांगड घालतानाच स्वदेशीचा मोठ्या प्रमाणावर पुरस्कार करून आयात टाळता येऊ शकते. त्यामुळे विदेशात जाणारे भारतीय चलन रोखता येईल आणि देश आर्थिकदृष्ट्या मजबूत होईल. आज लहान खेड्यांमध्ये अनेक लघुउद्योग सुरू असतात. त्यांना चालना देऊन, तेथील कारागिरांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या हातात पैसा खेळता राहील. लष्कर, ज्ञान, तंत्रज्ञान, कृषी, रस्ते निर्मिती, आत्मनिर्भर भारत निर्माणासाठी नवीन वर्ष नक्कीच सकारात्मक राहील, अशी प्रत्येक देशवासीयाला खात्री आहे.

९८५०७५३२८१

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# डॉ. मनमोहनसिंगांच्या स्मारकाचे अनावश्यक राजकारण

माजी पंतप्रधान आणि कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते डॉ. मनमोहनसिंग यांच्या अन्त्यसंस्कार स्थळाचे तसेच स्मारकाच्या मुद्याचे राजकारण करत कॉंग्रेसने अनावश्यक वाद निर्माण केला आहे. डॉ. मनमोहनसिंग यांचा अन्त्यसंस्कार अशा ठिकाणी करावा, जिथे त्यांचे स्मारक उभारता येईल, अशी मागणी कॉंग्रेसने केली होती. असे करत त्यांचा अन्त्यसंस्कार राजधानी दिल्लीतील यमुना नदीच्या किनाऱ्यालगतच्या राजघाट परिसरात करण्यात यावा, अशी अप्रत्यक्ष मागणी कॉंग्रेसने केली. मात्र डॉ. मनमोहनसिंग यांचा अन्त्यसंस्कार निगमबोध घाटावर करण्यात आल्यामुळे मोदी सरकारने देशातील पहिल्या शीख पंतप्रधानाचा अपमान केल्याचा आरोप कॉंग्रेसने केला. राजघाटवर अन्त्यसंस्कार हे काही प्रतिष्ठेचे आणि राजकीय मोठेपणाचे लक्षण नाही. मोदी सरकारने डॉ. मनमोहनसिंग यांचा अन्त्यसंस्कार राजकीय इतमामात केला. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि पंतप्रधान, अनेक केंद्रीय मंत्री तसेच तिन्ही सेनादलांचे प्रमुख यावेळी उपस्थित होते. त्यामुळे मोदी सरकारने शीख पंतप्रधानांचा अपमान केला, हा कॉंग्रेसचा आरोप खोडसाळ आणि हास्यास्पद असा म्हणावा लागेल. सामान्यपणे राजघाट परिसरात घटनात्मक पदांवरील व्यक्तींचा म्हणजे राष्ट्रपती, पंतप्रधान आणि अन्य मान्यवरांचा अन्त्यसंस्कार होतो. मात्र याठिकाणी घटनात्मक पदांवर नसलेल्या काही अपवादात्मक राजकीय नेत्यांवरही अन्त्यसंस्कार झाला आहे. सर्वांत पहिल्यांदा याठिकाणी राष्ट्रपिता महात्मा गांधींचा अन्त्यसंस्कार झाला. महात्मा गांधी संपूर्ण देशासाठी पूजनीय तसेच राष्ट्रपिता असले तरी ते कोणत्याही घटनात्मक पदावर नव्हते. महात्मा गांधींची समाधी राजघाट म्हणून ओळखली जाते. परदेशातील राष्ट्रप्रमुख आणि पंतप्रधान देशात आल्यावर राजघाटला भेट देत असतात. राजघाटवर अन्त्यसंस्कार झालेली पण घटनात्मक पदावर नसलेली दुसरी व्यक्ती संजय गांधी होते. विमान अपघातात मृत्यू झाल्यानंतर खासदार असलेल्या संजय गांधींचा या परिसरात अन्त्यसंस्कार करण्यात आला. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींचे पुत्र एवढाच त्याचा यासाठी निकष म्हणावा लागेल. राजघाटवर आतापर्यंत ४ माजी राष्ट्रपती, ८ माजी पंतप्रधान आणि दोन माजी उपपंतप्रधानांवर अन्त्यसंस्कार झाले. ग्यानी झैलसिंग, शंकरदयाल शर्मा, के. आर. नारायणन् आणि आर. व्यंकटरमन् या चार माजी राष्ट्रपतींच्या पार्थिवावर राजघाट परिसरात अन्त्यसंस्कार झाला. तसेच त्यांच्या समाध्या या भागात आहेत. पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पार्थिवावरही राजघाट परिसरात अन्त्यसंस्कार करण्यात आला. त्यांची समाधी 'शांतिवन' म्हणून ओळखली जाते. दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री याची या परिसरात असलेली समाधी 'विजयघाट' म्हणून ओळखली जाते. देशाचे पंतप्रधानपद भूषवलेले गांधी घराण्यातील इंदिरा गांधी आणि त्यांचे पुत्र राजीव गांधी यांच्या पार्थिवावरही या परिसरातच अन्त्यसंस्कार करण्यात आला होता. इंदिरा गांधींची समाधी 'शक्तिस्थळ' म्हणून, तर राजीव गांधींची समाधी 'वीरभूमी' म्हणून ओळखली जाते. चौधरी चरणसिंह, चंद्रशेखर तसेच इंद्रकुमार गुजराल या माजी पंतप्रधानांच्या पार्थिवावरही राजघाट परिसरात अन्त्यसंस्कार झाला होता. चरणसिंह यांची समाधी 'किसानघाट' म्हणून तर चंद्रशेखर यांची समाधी 'जननायक' स्थळ म्हणून परिचित आहे. इंद्रकुमार गुजराल यांचे समाधी-स्थळ 'स्मृतिस्थळ' म्हणून ओळखले जाते. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचीही समाधी या परिसरात आहे, जी 'सदैव अटल' नावाने सर्वांना परिचित आहे. देशाच्या दोन माजी उपपंतप्रधानांवरही राजघाट परिसरात अन्त्यसंस्कार करण्यात आला होता. जगजीवनराम आणि देवीलाल हे ते दोन नेते होते. खरं म्हणजे उपपंतप्रधान हे काही घटनात्मक असे पद नाही, तर ती राजकीय सोय आहे. देवीलाल यांच्या समाधी-स्थळाला नाव नसले तर जगजीवनराम यांचे समाधी-स्थळ 'समता स्थळ' म्हणून ओळखले जाते.

माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांचे निधन झाल्यावर दिल्लीतील लोधी रोड स्मशानघाटात त्यांच्या पार्थिवावर अन्त्यसंस्कार करण्यात आला होता. आज डॉ. मनमोहनसिंग यांच्या पार्थिवावर निगमबोध घाटात अन्त्यसंस्कार झाल्यामुळे आकाशपाताळ एक करणाऱ्या कॉंग्रेस नेत्यांनी, प्रणव मुखर्जींवर लोधी घाटात अन्त्यसंस्कार झाला असताना तोंड उघडले नव्हते. त्यामुळेच कॉंग्रेसच्या या दुटप्पीपणावर प्रणव मुखर्जी यांच्या कन्येने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांचे तर राजधानी दिल्लीतच निधन झाले होते. त्यावेळी कॉंग्रेसच्या प्रमुख असलेल्या सोनिया गांधी यांनी त्यांच्या पार्थिवावर दिल्लीत अन्त्यसंस्कार होऊ दिला नव्हता. हैदराबादला त्यांच्या पार्थिवावर नाईलाजाने अन्त्यसंस्कार करावा लागला होता. हे कमी होते की काय म्हणून कॉंग्रेसचे अध्यक्षपद तसेच देशाचे पंतप्रधानपद भूषवलेल्या नरसिंहराव यांचे पार्थिवही सोनिया गांधींनी कॉंग्रेस मुख्यालयात येऊ दिले नव्हते. त्यामुळे यावेळी डॉ. मनमोहनसिंग यांच्या अन्त्यसंस्कारावरून मोदी सरकारवर आगपाखड करण्याचा कोणातही नैतिक अधिकार कॉंग्रेसला नाही. हैदराबादला नरसिंहराव यांचे पार्थिव अन्त्यसंस्कारासाठी पाठवताना दिल्लीत त्यांचे स्मारक उभारण्याचे आश्वासन कॉंग्रेसने दिले होते, पण ते पाळले नाही. त्यामुळे नरसिंहराव यांचे स्मारक मोदी सरकारने राजघाट परिसरात उभारले आहे. माजी पंतप्रधान विश्वनाथ प्रतापसिंह यांचे २७ नोव्हेंबर २००८ ला दिल्लीतील अपोलो रुग्णालयात प्रदीर्घ आजारानंतर निधन झाले होते. २९ नोव्हेंबरला त्यांच्या पार्थिवावर अलाहाबादला (आताचे प्रयागराज) गंगा नदीच्या काठावर अन्त्यसंस्कार करण्यात आला होता. विशेष म्हणजे व्ही. पी. सिंग देशाचे असे एकमेव पंतप्रधान असावे ज्यांचे स्मारक देशात कुठेच नाही. देशातील पहिले गैरकॉंग्रेसी पंतप्रधान आणि जनता पक्षाचे नेते मोरारजी देसाई यांचे १० एप्रिल १९९५ ला मुंबईत निधन झाले होते. त्यांच्या पार्थिवावर अहमदाबाद येथे साबरमती नदीच्या काठावरील अभयघाटावर अन्त्यसंस्कार करण्यात आला. राजघाटचा एकूण समाधी परिसर हा २४५ एकराचा आहे. काही काही नेत्यांच्या स्मारकासाठी कित्येक एकर जागेचा उपयोग करण्यात आला आहे. हे असेच सुरू राहिले तर राजघाट परिसरात काही वर्षांनी राजकीय नेत्यांच्या अन्त्यदर्शनासाठी जागाच उरणार नाही, हे लक्षात घेऊन, ज्या डॉ. मनमोहनसिंग यांच्या अन्त्यसंस्कारावरून कॉंग्रेस अकांडतांडव करत आहे, त्याच डॉ. मनमोहनसिंग यांनी राजघाट परिसरात राजकीय नेत्यांच्या स्मारकासाठी एक स्मृतिस्थळ बनवले होते. कॉंग्रेसने आपल्याच पक्षाच्या नेत्यांचा जसा अपमान केला, त्यांची जशी विटंबना केली, तशी करण्याची भाजपाची संस्कृती नाही. तसे असते तर मोदी सरकारने नरसिंहराव यांच्या स्मारकासाठी राजघाट परिसरात जागा दिली नसती. त्यामुळे मोदी सरकार डॉ. मनमोहनसिंग यांच्या स्मारकासाठीही राजघाट परिसरातच जागा देईल, यात शंका नाही. कॉंग्रेसने याचे राजकीय भांडवल करू नये, यातून त्यांच्या 'पंजा'त काहीच पडणार नाही.

९८८१७१७८१७

### संसदेच्या कामकाजाचे टीव्हीवरील प्रसारण

नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यापासून म्हणजे २०१४ च्या निवडणुकीनंतरच संसदेच्या कामकाजाचे प्रसारण जनतेलाही दिसावे, संसदेत काय चालू आहे हे कळावे म्हणून प्रत्येक टीव्ही चॅनेलवरून प्रसारण दाखविण्यास सुरुवात झाली. तत्पूर्वी अशा प्रकारे पाहण्यात वा ऐकिवात नव्हते. संसदेत काय गोंधळ होतो हे फक्त वर्तमानपत्र वाचल्यानंतरच जनतेला समजत होते. पण २०१४ पासून राष्ट्रपतींचे भाषण, राष्ट्राचे आर्थिक उन्हाळी व हिवाळी अधिवेशन वा आर्थिक वर्षाचे बजेट, संसदेतील इतर अनेक कार्यक्रम प्रसारित होऊ लागले. पण ते पूर्णतः नाही. भाषण, बजेट व इतर कार्यक्रम असतील तर विशिष्ट व्यक्तीवरच संसदेतील कॅमेरा फोकस करून प्रसारित होत आहे. त्यामुळे फक्त विशिष्ट व्यक्तींचेच ते सत्ताधारी पक्षाचे असो वा विरोधी पक्षांचे असो तेच चेहरे टीव्हीवर दिसत असतात. विरोधकांनी केलेली आरडाओरड, नारेबाजी फक्त ऐकायला येत असते पण कोणत्या पक्षाचे लोक या अभूतपूर्व कार्यक्रमात सहभाग घेत आहे व कामकाजात व्यत्यय आणत आहे त्याचे दृश्य दिसत नाही. त्यावर कॅमेरा फोकस करून दाखविण्यात येत नाही. हे संसदेचे कामकाज संपूर्ण जगाला दिसावे यासाठी संसदेतील कॅमेरा, पक्ष व विरोधकांची जी लॉबी असते म्हणजे संपूर्ण संसदेत फिरवून दोन्ही पक्षांच्या खासदारांचे चेहरे टीव्हीवर दाखविण्यात आले तर बरे होईल. अन्यथा नुसती आरडाओरड ऐकू येईल. नागरिकांच्या समस्या मांडणारे कोण आणि गोंधळ घालणारे कोण हे सत्य समोर येईल.

**मधुसूदन भावे**/७६२०६२९७२८

●● ●●

### नियंत्रित वाहतूक एक आव्हान!

नागपूर शहरातील वाहतूक समस्या ही आता आव्हानात्मक झाली आहे. शहराचा विस्तार होत असून रस्त्यावर सर्व प्रकारच्या वाहनाची प्रचंड गर्दी वाढल्याने व चौकातील सिग्नल्स यांना कोणीही जुमानत नसल्याने जीव मुठीत घेऊन वाहन चालवावे लागत आहे. पायी चालणारे नागरिक तर दिसतच नाही. प्रत्येक चौकात वाहनांची प्रचंड कोंडी होते. त्यात रस्त्याच्या कडेला बसलेले विक्रेते, चौकानंतर

## वाचक पत्रे

मध्येच प्रवाशांना उतरविणारे सवारी ऑटोचालक, मोबाईलवर बोलणारे दुचाकीवाहक आणि कसेही, कुठूनही वाहन चालविण्याचे व्रत पाळणाऱ्या व जगाची घाई असलेल्या अति व्यस्त वाहनचालकांना कसे आवरावे हा खूप मोठा संशोधनाचा विषय आहे. चौकात वाहतूक नियंत्रित करणारे पोलिस कधी कधी दिसतात. सिग्नलवर एखादा मध्येच शिरून सावज शोधतो, त्याच्या वाहनाचा फोटो काढतो, त्याचे वाहन बंद करून चावी हातात घेतो आणि त्याला रस्त्याच्या कडेला बाजूला नेऊन शिकार करतो. त्यावेळेस त्याचे मोठे साहेब तिकडच्या भागात गस्तीवर असतील तर हा पोलिस त्वरित चालान तयार करून त्या वाहनचालकाला दंड ठोठावून मोकळा होतो. याविरुद्ध दृश्य असेल तर सावज कसा आहे? त्याने काय गुन्हा केला आहे? त्याचा दंड किती हजार होईल? वाहन जप्त करावे लागेल? इत्यादी नियम सांगून वाहनचालकाला मानसिक तयारी करायला वेळ देतो. त्याच्या मदतीला दुसरा पोलिस येऊन नागरिकशास्त्राचे धडे देतो. एव्हाना हा वाहनचालक त्यातील समजूतदार पोलिसांशी वाटाघाटी करून सुटलो एकदाचे! या आविर्भावात पुढे निघतो. एवढ्या वेळात रस्त्यावरील इतर वाहनचालक स्वतःहून नियंत्रित होतात आणि थोड्या वेळाकरिता का होईना आपल्याला पण सुकरपणे वाहन चालविण्याचा अल्पसा आनंद मिळतो.

**संजय पाठक**/नागपूर

●● ●●

### देशभक्तीची ऊर्जा देणारे अकोल्यातील हुतात्मा स्मारक

अकोला शहरात प्रवेश करताच शहरातील हुतात्मा स्मारक जाणाऱ्या येणाऱ्यांचे लक्ष वेधून घेते. अलिकडच्या काळात या स्मारकाचे नूतनीकरण करण्यात आले आहे. स्मारकाच्या प्रवेशद्वारावर भारत-पाकिस्तान युद्धातील भला मोठा रणगाडा निवृत्त झाल्यानंतरही ताठ मानेने आपल्या दिव्य कामगिरीची प्रचीती देतो. मुख्य प्रवेशद्वारातून आत गेल्यास स्वातंत्र्य लढ्यात व विविध युद्धमोहिमेत हुतात्मा झालेल्या अकोला जिल्ह्यातील थोर सुपुत्रांची संपूर्ण माहिती व देशासाठी त्यांचं योगदान वाचून डोळ्यांच्या कडा पाणावल्याशिवाय राहात नाहीत. या स्मारकातील आणखी एक आकर्षण म्हणजे येथे स्वातंत्र्यलढ्यातील एक लोखंडी पाना संग्रही ठेवला आहे. स्वातंत्र्य लढ्यातील एका मोहिमेत रेल्वे रूळ उखडून टाकण्यासाठी हा पाना सावतराम मिलमध्ये काम करणाऱ्या आगरकर यांनी तयार करून क्रांतिकारकांना दिला होता. या पान्याचा उपयोग मिलिटरी ट्रेन पाडण्यासाठीच्या कटात केला होता असा ऐतिहासिक उल्लेख आहे. सभोवताल हिरवीगार वनराई, विविध रंगी फुलझाडे यामुळे वातावरणात वेगळीच प्रसन्नता येते. जड पावलांनी स्मारकाबाहेर पडताना देशभक्तीचा वारसा नकळत सोबत घेऊन जाताना 'कर चले हम फ़िदा जानो-तन साथियों' या देशभक्तीचे स्फुलिंग चेतवणाऱ्या ओळी नकळत ओठावर येतात.

**अखिल देशपांडे**/अकोला

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### मोबाईलसाठी मुलाने केली आत्महत्या

**परभणी,/प्रतिनिधी :** पाथरी तालुक्यातील केदार वस्ती येथील अक्षय हनमंत तिडके या १८ वर्षीय मुलाने मोबाईल का घेत नाहीत म्हणून रागाच्या भारात फवारणीचे विषारी औषध प्राशन करीत आत्महत्याा केली.

पाथरी पोलिस ठाण्यात हनमंत तिडके यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे मुलाने १४ डिसेंबर रोजी हे कृत्या केले. त्याावर उपचाराकरीता छत्रपती संभाजी नगरातील खाजगी रुग्णालयात दाखल केले. परंतु, उपचार सुरु असतांना मुलाचा मृत्यू झाल्याचे नमूद केले. दरम्यान, पाथरी पोलिसांनी या प्रकरणात आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

### जमजम कॉलनीतन ८० हजारांची रोकड लंपास

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील जमजम कॉलनीतील एका निवास्थानातून अज्ञात चोरट्यांनी ८० हजार रुपयांची रोख रक्कम लंपास केली.

शेख इरफान यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात एक तक्रार दाखल केली. त्याद्वारे २५ डिसेंबर रोजी सायंकाळी आपण सासरवाडीस गेलो असतांना अज्ञात चोरट्यांनी घरातील अलमारीचे कुलूप तोडून रोख ८० हजार रुपये, एटीएम कार्डसह अन्य वस्तू पळविल्याचे नमूद केले. दरम्यान, या प्रकरणात कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### भाजपाद्वारे दोन लाख सदस्य नोंदणीचा संकल्प

**परभणी,/प्रतिनिधी :** सदस्य नोंदणी अभियानातून या जिल्ह्यात नवीन दोन लाख सदस्य नोंदणीचा संकल्प भारतीय जनता पक्षाच्या पुढाऱ्यांनी निरीक्षकांसह संघटनमंत्र्याांसमोर सोडला.

सदस्य नोंदणीच्या पार्श्वभूमीवर येथील आयएमएच्या सभागृहात शनिवार २८ डिसेंबर रोजी जिल्हास्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी विभागीय संघटन मंत्री संजय कौडगे, तसेच प्रदेश सचिव राहुल लोणीकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष संतोष मुरकुटे, महानगर जिल्हाध्यक्ष राजेश देशमुख, प्रदेश प्रवक्ते डॉ. उमेश देशमुख, जिल्हा महामंत्री सुभाष आंबट, डॉ. केदार खटींग, माजी जिल्हाध्यक्ष डॉ. सुभाष कदम, विलास बाबर, शिवाजीराव मव्हाळे, शशिकांत देशपांडे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी प्रत्योक पदाधिकाऱ्याने या जिल्ह्यात सदस्य नोंदणीचे अभियान मोठ्या प्रमाणावर यशस्वी करण्याचा संकल्प सोडला. लोकसभा, विधानसभा निवडणूकीत भाजप व इतर मित्रपक्षांना पूरक असे वातावरण निर्माण झाले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका डोळ्यासमोर ठेवून सदस्य नोंदणीकरीता निश्चितच सर्वार्थाने प्रयत करावेत, असे आवाहनसुध्दा यावेळी मान्यवरांनी केले.

### लंगोटे करणार रस्ते कामासाठी उपोषण

**परभणी,/प्रतिनिधी :** जिंतूर रस्त्याावरील वीज वितरण कंपनी ते स्त्री रुग्णालय तेथून पुढे वैकुंठधाम स्मशानभूमी पर्यंतच्या रस्त्यााचे काम महापालिका प्रशासनाने तात्काळ सुरु करावे, अन्यथा आपण १ जानेवारीपासून बेमुदत उपोषणास बसू, असा इशारा माजी नगरसेवक विकास प्रभाकरराव लंगोटे यांनी दिला आहे.

या रस्त्यााची अवस्था भयावह आहे. तरीसुध्दा या रस्त्याावरुन आदळआपट करीत स्त्री रुग्णालयाकडे जाणारे रुग्ण व त्याांचे नातेवाईक मोठ्या यातना सहन करत आहेत. त्यााचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, मुन्सिपल कॉलनी, संजय गांधी नगर, बँक कॉलनी, अजमेर कॉलनी, सुभेदार नगर, मंगेश नगर, डॉ. अब्दुल कलाम नगर, जावई कॉलनी, सालासार नगर या भागातील नागरीकांनाही ये-जा करण्याकरीता हाच रस्ता आहे. त्याामुळे या रस्त्याावर ये जा करतांना नरक यातना भोगल्याशिवाय कोणताही पर्याय नागरीकांसमोर नाही. त्याामुळे महापालिका प्रशासनाने या रस्त्यााच्या दुरावस्थेसह या रस्त्याावरील दुतर्फा अतिक्रमणे ओळखून तात्काळ कारवाई सुरु करावी, अशी अपेक्षा माजी नगरसेवक लंगोटे यांनी व्यक्त केली.

### धर्मापूरी जि.प. शाळेत रतन टाटा यांची जयंती

**परभणी,/प्रतिनिधी :** धर्मापूरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शनिवारी (दि.२८) शालेय परिपाठात आजचा दिनविशेष या सदरात रतन टाटा यांची जयंती साजरी करण्यात आली. 'आजचा आनंददायी शनिवार' या उपक्रमांतर्गत सृजनशीलतेचा विकास आणि सृजनशीलतेचा आनंद मिळावा म्हणून रतन टाटा यांचे जयंतीचे औचित्या साधून सामान्य ज्ञान स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा इत्याादींचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षक वैद्य तर प्रमुख वक्ते तथा मार्गदर्शक म्हणून शिक्षक अनिल बसुळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून मुरलीधर खेडकर व श्रीमती विमल धंदर यांची उपस्थिती होती. सुरुवातीस प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शाळेचे भाषा शिक्षक डी. एस. फुलवरे यांनी प्रस्तावना केली. नारायण वैद्य यांनी 'जिंदगी के सफर में गुजर जाते है जो मकाम' हे गीत रतन टाटांना समर्पित केले. प्रमुख मार्गदर्शक अनिल बसुळे यांनी रतन टाटा यांचे संपूर्ण जीवन त्याांच्या जीवनातील विविध प्रसंग, त्याांची देशभक्ती त्याांचा तो कणखरपणा, नम्रपणा, नैतिकता जागतिक स्तरावरचे उद्योगातील नेतृत्व, अपमानातून यशात रूपांतर, त्याांनी केलेलं शैक्षणिक कार्य, सामाजिक दातृत्व या सर्व बाबींचा उलगडा विद्यार्थ्यासमोर केला. श्रीमती विमल धंदर यांनी त्याांच्या विचारांवर प्रकाश टाकला. भटक्या कुत्र्याबाबतचा त्याांचा दृष्टिकोन, वंचिताबद्दलचे सामाजिक उपक्रम, करुणा, परोपकार इत्यादी गुणांबद्दल विद्यार्थ्यांना त्याांनी सखोल माहिती दिली.

फुलवरे यांनी अनामवीरा ही कुसुमाग्रजांची कविता रतन टाटा यांना समर्पित केली. ज्याप्रमाणे एक ज्ञात आणि अज्ञात सैनिक आपल्या देशाच्या संरक्षण करतो त्याचप्रमाणे रतन टाटा यांनी सर्वच क्षेत्रात आपले योगदान सिद्ध केले आहे. अनाम वीरा या कवितेतून त्याबद्दलचा भाव व्यक्त होतो. रतन टाटा यांच्या जयंतीनिमित्त सर्व विद्यार्थ्यांना चॉकलेट वाटप करण्यात आले. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मु. अ. सय्यद सलीम, मुरलीधर खेडकर, नारायण वैद्य, देवानंद फुलवरे, अनिल बसुळे, श्रीमती सुरेखा शिंदे, श्रीमती श्रुतिका धुमाळ, श्रीमती रूपाली लोलगे, विमल धंदर आदींनी परिश्रम घेतले.

तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया

छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी

खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

# त्या दोन्हीही कुटुंबीयांना शासनाकडून निश्चितच मदत: आठवले यांचे आश्वासन

**परभणी ,/प्रतिनिधी:-** केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज दिवंगत सोमनाथ सूर्यवंशी आणि आंबेडकरी चळवळीतील दिवंगत लोकनेते विजय वाकोडे यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली. दोन्ही कुटुंबांना शासनाच्यावतीने निश्चितपणे मदत केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

श्री. आठवले यांनी सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबियांकडून त्याांची व्यथा जाणून घेतली. परभणीत घडलेली घटना ही दुर्दैवी आहे. या प्रकरणाची पारदर्शकपणे सखोल चौकशी व्हावी व दोषींवर कार्यवाई करण्यात यावी, यासाठी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहोत. शासन हे सूर्यवंशी कुटुंबीयांच्या पाठीशी असून त्याांना सर्वोतोपरी मदत केल्या जाईल. असे श्री. आठवले यांनी यावेळी सांगितले.

आंबेडकरी चळवळीतील दिवंगत लोकनेते विजय वाकोडे यांच्या कुटुंबियांची त्याांच्या राहुलनगर स्थित घरी जावून श्री. आठवले यांनी सांत्वनपर भेट घेतली. समाजासाठी तळमळीने काम करणारा एक चांगला लोकनेता जिल्ह्याने गमावला आहे. त्याांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीला मोठा धक्का बसला आहे. त्याांच्या स्मारकासाठी निश्चितपणे प्रयत केले जातील, असे श्री. आठवले यांनी याप्रसंगी सांगितले.

दरम्यान, शासकीय विश्रामगृह येथे आयोजित बैठकीत श्री. आठवले यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी आणि अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे यांच्याकडून घटनेचा व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा



ढालकरी, उपविभागीय अधिकारी दत्तु शेवाळे उपस्थित होते.

## उत्कर्ष विद्यालयात रामायण महाकाव्य नाटिका मोठ्या उत्साहात संपन्न

**सेलू,/प्रतिनिधी:** येथील श्रीराम प्रतिष्ठान सूरभी म होत्सव २०२४ अंतर्गत उत्कर्ष विद्यालयात रामायण महाकाव्य नाटिका मोठ्या उत्साहात संपन्न झाली या नाटिकेत विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला.

आपल्या अंगी असलेले सुप्त गुण दाखवून प्रेक्षकांची प्रमुख पाहुण्यांची मने जिंकली ही नाटिका पाहत असताना आपण राम युगात आहोत इतका प्रामाणिक प्रयत विध्यार्थ्यांनी नाटिका सादर करते वेळस केला. सर्वांना राम युगाची आठवण करून दिली.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, नटराज व छत्रपती शिवरायांच्या पूजनाने करण्यात आली. या महाकाव्य सोहळ्यास उद्घाटक म्हणून म ाजी आमदार हरिभाऊ लहाने, श्रीराम प्रतिष्ठानच्या सचिव



डॉ. सविताताई रोडगे तसेच सत्कारमूर्ती आमदार राजेश विटेकर (पाथरी विधानसभा), सचिन मगर, दादासाहेब टेंगसे , रामराव बोबडे,दिलीप डासाळकर ,निशिकांत पाटील, श्री रामेश्वर गायकवाड ,डॉ. प्रताप शिंदे,डॉ. दिगंबर घोडके, मंचक अचाने, डॉ. राजेंद्र गात, अँड. जी एच साडेगावकर माननीय संदीप टाक माननीय श्री गुलाबराव ताठे, श्रीराम प्रतिष्ठानचे प्रशासकिय अधिकारी प्रा. महादेव साबळे, मुख्याध्यापक कैलाश ताठे, हरिभाऊ कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. रामायण नाटिका प्रसंग दाखवण्यात आले त्याामध्ये राम, सीता, लक्ष्मण वनवासाला निघाल्यानंतर अयोध्यावासीयांच्या भावनांचा उठलेला कल्लोळ...अन् हनुमानाच्या भेटीपासून ते सीतेची लंकेतून सुटका करीत रावणाच्या वधापर्यंत, एक, दोन नव्हे तर गीतराम ायाणातील तब्बल २० प्रसंग, नृत्या, नाट्य व संगीताच्या म ाध्यमातून उत्कर्ष विद्यालय व ज्ञानतीर्थ माध्यमिक शाळेच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी अवघ्या दीड तासात उलगडले ! ही नाटिका पाहून समोर बसलेल्या प्रेक्षकांची दाद मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांना मिळाली तसेच त्यांचे भरभरून कौतुक करण्यात आले म ान्यवरांनी देखील शाबासकीची थाप त्याांच्या पाठीवरती दिली व रामायण महाकाव्य मोठ्या उत्साहात या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतल्या चिमुकल्यांनी केले त्यांना मार्गदर्शन दिगंबर टाके, संदीप आकात यांनी केले.

## त्या रस्त्याच्या कामाची निविदा निघणार- लंगोटे

**परभणी,/प्रतिनिधी-** जिंतूर रस्त्याावरील वीज वितरण कंपनीच्या कार्यालयापासून स्त्री रुग्णालय तेथून पुढे वैकुंठधाम स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामाच्या निविदा लवकरच निघणार असल्याची माहिती महापालिका प्रशासनाने दिली असून त्याामुळे आपण नियोजित आंदोलन तूर्त स्थगित करीत आहोत, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे महानगर कार्याध्यक्ष तथा माजी नगरसेवक विकास लंगोटे यांनी दिली.

लंगोटे यांनी ९ डिसेंबर रोजी मनपा आयुक्त तथा प्रशासक धैर्यशील जाधव यांना या रस्त्याच्या दुरावस्थे संदर्भात निवेदन दिले होते, त्याद्वारे रस्त्याचे काम मार्गी न लागल्यास नवीन वर्षाच्या सुरुवातीला म्हणजे १ जानेवारी २०२५ पासून प्रभागातील नागरिकांसहित आमरण उपोषणास बसण्याचा इशारा दिला होता.या निवेदनाची दखल घेऊन महापालिकेचे शहर अभियंता यांनी या रस्त्याच्या कामाला शासनाची मंजुरी आली आहे, प्रशासकीय म ान्यताही प्राप्त झाली असून लवकरच निविदा प्रक्रिया करण्यात येऊन हे काम चालू करण्यात येणार आहे. त्याामुळे आपण आपल्या मार्फत करण्यात येणारे उपोषण रद्द करून प्रशासनास सहकार्य करावे, अशा आशयाचे पत्र लंगोटे यांना दिले आहे. त्याामुळे आपण नियोजित आंदोलन तूर्त स्थगित करीत आहोत, असे लंगोटे यांनी म्हटले.

दरम्यान, यावेळी शहर अभियंता ठोंबरे, बांधकाम विभाग प्रमुख वसीम खान पठाण, माजी नगरसेवक विकास लंगोटे, राष्ट्रवादी युवकचे शहर उपाध्यक्ष दत्ता सवंडकर, अमीन भाई, रौफ भाई अन्सारी, गजानन मोरे, कदम आण्णा, तय्यब भाई, गौतम शिंदे, अतिक भाई, कलीम भाई आदी प्रभागातील नागरिक उपस्थित होते.

## जिंतूरात ७ जानेवारीला श्रीगौरी सावंत यांचे व्याख्यान

**जिंतूर,/प्रतिनिधी-** तालुका मराठी पत्रकार संघातर्फे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दर्पण दिनाचे औचित्या साधून ७ जानेवारी रोजी संध्याकाळी सहा वाजता शहरातील भाजी मंडई परिसरातील कन्या प्रशाला मैदानात आंतरराष्ट्रीय व्याख्यात्याा श्रीगौरी सावंत यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

दर्पण दिनानिमित्त ६ जानेवारी रोजी पत्रकार भवनामध्ये ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान, पत्रकारांना विम्याचे, भेटवस्तूचे वाटप तर ७ जानेवारी रोजी श्रीगौरी सावंत यांच्या जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यमंत्री मेघना बोर्डीकर तर प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय पोलिस अधिकारी जीवन बेनिवाल, श्री तुळजाभवानी साखर कारखान्याच्या चेअरमन भावना बोर्डीकर, सुंदरलाल सावजी अर्बन बँकेचे चेअरमन मुकुंद सावजी कळमकर, ज्येष्ठ विधीज्ञ अशोक सोनी, ब्रिजगोपाल तोष्णीवाल, अँड. मनोज सारडा, माजी नगराध्यक्ष प्रताप देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमांमध्ये पत्रकारितेला ज्यांनी संपूर्ण आयुष्य वाहिले आहे, असे पत्रकार एम. ए. माजिद, निहाल अहेमद यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन संघाचे अध्यक्ष, पदाधिकारी व सदस्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

दरम्यान, तालुक्याला तब्बल ४० वर्षानंतर मंत्रिपद मिळाले असल्यामुळे राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांचाही विशेष सन्मान करण्यात येणार आहे.



परभणी-महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री ना.मेघना बोर्डीकर यांच्या प्रयत्नातून मौजे अंबरवाडी गावातील विविध विकास कामाचे भूमीपूजन कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती गंगाधर बोर्डीकर यांच्या हस्ते पार पडले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामराव घुगे, शामसुंदर मस्के, विकास जाधव अंबरवाडीकर, पुरुषोत्तम पाटील, नारायणराव घुगे, प्रभू जाधव, गजानन काळे, प्रदीप जाधव, लक्ष्मणराव घुगे, विष्णू काळे, दिगंबर घुगे, अमोल घुगे, ऋषी घुगे, सुनील घुगे,रवी घुगे,फकीरा बोडखे, शिवप्रसाद काळे दिसत आहेत.

## मतदारसंघातील लोकांच्या प्रेम, स्नेहाचे ऋण फेडणे अशक्य - आ.डॉ.गुट्टे; इसाद येथे नागरी सत्कार : जुन्या आठवणींना उजाळा

**गंगाखेड,/प्रतिनिधी-** यंदाची निवडणूक फार निर्णायक होती. त्याामध्ये आपले गाव माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आहे. त्याामुळे या विजयात आपलाही वाटा आहे. तसे बघितले तर हा केवळ माझ्या एकट्याचा नव्हे, तर मतदारसंघातील प्रत्योक व्यक्तीचा विजय आहे. मी केवळ निमित्तमात्र आहे. तरीही गावोगावी स्थानिक लोक मोठ्या आपुलकीने सत्कार करीत आहेत. यापूर्वीचे कामांचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी सदिच्छा देत आहेत. त्याामुळे दररोज आपण भावनिक होत असून मतदारसंघातील लोकांच्या प्रेम, स्नेहाचे ऋण फेडणे अशक्य आहे, असे भावुक प्रतिपादन स्थानिक आ.डॉ. रताकर गुट्टे यांनी केले.

तालुक्यातील मौजे.इसाद येथील छत्रपती शिवाजी चौकात आयोजित नागरी सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. याप्रसंगी सलग दुसऱ्यांदा विजयी झाल्याबद्दल आ.डॉ.गुट्टे यांचा रासप, मित्रमंडळ आणि सर्व ग्रामस्थांच्या वतीने शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ



देवून जाहीर नागरी सत्कार करण्यात आला. तत्पूर्वी, आ.डॉ.गुट्टे यांची घोड्यावरून मिरवणूक काढण्यात आली. कार्यक्रमाचे औचित्या साधून आ.डॉ.गुट्टे गावातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी त्याांना मल्हार ग्रुपच्या वतीने काठी आणि घोंगडी देवून सत्कार करण्यात आला.

पुढे बोलताना आ.डॉ.गुट्टे म्हणाले की, आपल्या मतदारसंघाच्या चौफेर विकासाची भूमिका घेवून पुढे जायचे आहे. तुमच्या सर्वांच्या सोबतीने विकासाचे राजकारण करायचे आहे. त्याामुळे निवडणूक काळातले प्रसंग व घटना सोडून द्या. आपापसातील मतभेद दूर करा. शेवटी आपल्या भागाचा विकास होणे गरजेचे आहे. त्याामुळे मधल्या काळात जे झालं ते विसरून मतदारसंघातील गावोगावी सर्वांनी एकत्र यायला हवे. कारण, सर्वांच्या साथीने विकासाला नवी दिशा व चालना मिळत असते. म्हणून झालं गेलं विसरून कामाला लागा. तसेच आपापल्या गावच्या व परिसराच्या समस्या, अडचणी व प्रश्न माझ्या निर्देशनास आणून द्या. तसे झाले तर आपल्या मतदारसंघात प्रश्न, समस्या, अडचणी शिल्लक राहाणार नाहीत. त्याामुळे सर्वांना एकजूट व्हा आणि आपल्या गावाचा व परिसराचा विकास करता येईल, याकडे विशेष लक्ष द्या. कारण, गाखेड हा माझ्यासाठी केवळ विधानसभा मतदारसंघ नसून माझा परिवार आहे.

आपल्या मतदारसंघातील प्रत्योक गावात माझा उत्तम संपर्क आहे. प्रत्योकाला मी भेटत असतो. त्याांचे प्रश्न व अडचणी दूर करीत असतो. त्याातून मलाच समाधान मिळते. सर्वसामान्य लोकांची व्यक्तीगत कामांसह सार्वजनिक कामेही मार्गी लावल्यामुळे त्याांना माझ्या विषयी आदर आणि आपुलकी आहे. तशी आपुलकी आपल्या गावानेही वेळोवेळी दाखवून दिली आहे. त्याामुळे हेच प्रेम, माया, आपुलकी आणि विश्वास कायम असू द्या. कारण, हे जिव्हाळ्याचे व आपुलकीचे नाते जपण्याचा मी सुध्दा प्रामाणिक प्रयत करणार आहे. तसेच येत्याा काळात आपल्या मतदारसंघात सुविधांची समृद्धी निर्माण करण्यासाठी कटिबध्द आहे. तसेच निवडणूक प्रचाराच्या दरम्यान दिलेली सर्व आश्वासने आणि शब्द पूर्ण करण्यासाठी विशेष परिश्रम सुध्दा करणार आहे, असेही आ.डॉ. गुट्टे यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक किशनराव भोसले यांनी केले तर आभार तालुकाध्यक्ष रामप्रसाद सातपुते यांनी म ानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभाकर सातपुते यांनी केले.

# वसमत नगर पालिकेकडून शहरातील ३०० अतिक्रमणांवर हातोडा

## मुख्य रस्त्यांनी घेतला मोकळा श्वास, नागरिकांमध्ये समाधान



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जानेवारी**
वसमत शहरातील मुख्य रस्त्यासह इतर ठिकाणची अतिक्रमणे हटविण्यास आजपासून नगर पालिकेने सुरूवात केली असून पहिल्याच दिवशी नगर पालिकेने ३०० अतिक्रमणे हटवली आहेत. त्यामुळे अनेक वर्षानंतर रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला असून या कारवाईचे नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.
तहसीलदार शारदा दळवी यांना व्यापारी संघटनेकडून शहरातील अतिक्रमणांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्यामुळे सदरील अतिक्रमणे हटविण्याची मागणी करण्यात आली होती. या अतिक्रमणामुळे रस्ते अरूंद बनले होते तसेच रस्त्यावरून पायी चालणेही कठीण झाले होते. दोन दिवसांपूर्वी तहसीलदार शारदा दळवी यांनी शहरातील अतिक्रमणांची प्रत्यक्ष पाहणी केली होती. यावेळी त्यांनी नगर पालिकेच्या कार्यपध्दतीवर तीव्र नाराजी व्यक्त करीत तत्काळ शहरातील अतिक्रमणे हटविण्याच्या सूचना दिल्या होत्या. तसेच शहरासह राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणे तातडीने हटविण्याच्या सूचनाही दिल्या होत्या.
त्यानंतर दि २ जानेवारी रोजी नगर पालिकेच्यावतीने शहरातील अतिक्रमणावर हातोडा चालविण्यात येत आहे. पोलिस बंदोबस्तात अतिक्रमणे हटविण्यास सुरूवात झाली आहे. यावेळी पालिकेचे मुख्याधिकारी निलेश सुंकेवार, उपनिरीक्षक शिवाजी बोंडले यांच्यासह पालिकेच्या अतिक्रमण हटावो पथकाने शहरातील महावीर चौक ते कारंजा चौक या वर्दळीच्या रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यास सुरूवात केली. पहिल्याच दिवशी तब्बल ३०० अतिक्रमणे हटविण्यात आली तर फळविक्रेते व भाजीपाला विक्रेते यांची अतिक्रमणे काढून त्यांना आठवडी बाजारात पर्यायी जागा उपलब्ध करून दिली आहे. सदरील अतिक्रमण हटाव मोहीम शहरातील संपूर्ण अतिक्रमणे काढेपर्यंत सुरूच राहणार असल्याचे प्रशासनाच्यावतीने सांगण्यात आले आहे. यानंतर अतिक्रमणे केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे पालिकेच्या सुत्रांनी सांगितले आहे.

# पोलिस उपमहानिरीक्षक उमाप यांच्या उपस्थितीत स्नेहसंमेलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जानेवारी**
नांदेड परीक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या उपस्थितीमध्ये येथील संत नामदेव पोलिस कवायत मैदानावर पोलिस अधिकारी व कर्मचारी यांचे स्नेहसंमेलन पार पडले. यावेळी परेड सह विविध प्रात्यक्षिके हिंगोली पोलिस दलाच्यावतीने सादर करण्यात आली.



नांदेड परीक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांचा दि २ जानेवारी रोजी हिंगोली जिल्हा दौरा होता. यावेळी येथील संत नामदेव पोलिस कवायत मैदानावर पोलिस अधिकारी व कर्मचारी यांचे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. यावेळी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पोलिस दलातील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या अडीअडचणीबाबत त्यांच्याशी स्नेहसंमेलनात संवाद साधण्यात आला तसेच पोलिस अधिकारी, कर्मचारी यांच्या अडचणीबाबत तत्काळ निवाडा करण्याचे आश्वासन यावेळी उमाप यांनी दिले.
त्यानंतर पोलिस परेड, श्वान पथक, दंगल नियंत्रण पथक तसेच इतर पथकांनी विविध प्रात्यक्षिके सादर केली. या प्रात्यक्षिकांची पाहणी उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केली तसेच समाधान व्यक्त केले.

# पुरवठा विभागातील ऑनलाईन डेटा फिडींग सुविधा तत्काळ सुरू करण्याची भारतीय जनता पक्षाची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जानेवारी**
कळमनुरी पूरवठा विभागातील ऑनलाईन डेटा फिडींग सुविधा तात्काळ सुरु करून लाभार्थ्यांना गरीब अल्पभूधारक एनपीएच कार्ड धारकांचा प्राधान्य कार्डात सतावेश करून धान्य सुविधा मिळावी या मागणीसाठी कळमनुरी भारतीय जनता पक्षाच्यावतीने तहलसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले.



कळमनुरी शहर व तालुक्यातील लाभार्थ्यांना रास्तभाव दुकानातून मिळणाऱ्या धान्याचा लाभ होण्यासाठी तहसीलदार यांना भाजपने निवेदन सादर केले. त्यामध्ये गरीब अल्पभूधारक एन पि एच कार्ड धारकांचा प्राधान्य कार्डात समावेश करुन धान्य सुविधा मिळावा तसेच सायलेंट आर सी असतील तर त्या जागी नव्याने एन पि एच धारकांना सुविधा देण्यात यावी. तसेच शेतकरी कुटुंब धारकांचा प्रति युनिट आर्थिक मदत लाभाच्या योजनेची तात्काळ अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली.
यावेळी तालुकाध्यक्ष शंकर सुर्यवंशी शहराध्यक्ष अशोक संगेकर, अमिष दरक, प्रकाश नाईक, अंबादास कल्याणकर, विकास ठाकुर, दामुअणा शिंदे, सोनबा बूर्से, नारायण डुरे, दता पंचलिंगे, भागवत ठाकुर, गणपत वाढवे, मुकेश इंगोले, अनिल इंगळे, सतिष कुळकर्णी, एहसान सिदीकी, साजेद पठाण, विजय शिंदे, शंतनु सुर्यवंशी, जी वाय पतंगे, अनिस बागवान आदींची उपस्थिती होती.



**हिंगोली– हिंगोली विधानसभेचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी नगरसेवक चंदू लव्हाळे आदी. छाया– विजय गुंडेकर**

# सांदीपनी पब्लीक स्कूलची रक्षिता बकवाड हीचे राष्ट्रीय स्तरावर पदक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जानेवारी**
राज्यस्तरीय सेपक टाकरा क्रीडा स्पर्धा नुकत्याच राष्ट्रीय पातळीवर पार पडल्या. या स्पर्धेत सांदिपनी पब्लिक स्कूलची कु रक्षिता रवीकुमार बकवाड यांची सातव्या सब ज्युनिअर राष्ट्रीय सेपक टाकरा क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली. सेपक टाकरा फेडरेशन ऑफ इंडियाच्या मान्यतेने केरळच्यावतीने केरळ येथे दिनांक २२ ते २६ डिसेंबर २०२४ या कालावधीत सातव्या सब ज्युनिअर राष्ट्रीय सेपक टाकरा क्रीडा स्पर्धा पार पडल्या.



या स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात नांदेड जिल्ह्याच्या चार मुलींची निवड झाली. सदरील निवड नांदेड जिल्हा सेपक टाकरा असोसिएशनच्या माध्यमातून करण्यात आली होती. नांदेड जिल्हा संघाने वर्धा येथे झालेल्या स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला होता. या स्पर्धेतून सांदिपनी पब्लिक स्कूल, सुनील नगर, तरोडा (बु), नांदेड येथील खेळाडू कु रक्षिता रवी कुमार बकवाड यांची राष्ट्रीय स्तरावर निवड झाल्यामुळे ती केरळ राष्ट्रीय सेपक टाकरा संघाचे प्रतिनिधित्व करून महाराष्ट्राच्या मुलींच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला. या यशाबद्दल शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, विपुल राठोड, सौ. रेश्मा विपुल राठोड, सौ. माहेश्वरी मुकुल राठोड, शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रीत कौर, प्रशासक मारुती मेखाले व शाळेतील सर्व शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

## संक्षिप्त वृत्त

### हिंगोलीत शौर्य दिनानिमित्त अभिवादन



हिंगोली– शहरातील सिद्धार्थ (मिलिंद) कॉलनी येथे भीमा कोरेगाव २०७ व्या शौर्य दिनानिमित्त शहिद शुर सैनिकांना अभिवादन करण्यात आले. या वेळी प्रयागबाई हानवते,निवृत्ती सरकटे, प्रकाश इंगोले ,भाऊराव पंडित,अनुप हानवते, शिवाजी दिपके, सुरेश कुऱ्हे,राजू इंगोले, गिताबाई दिपके,उषा इंगोले, विमल पंडित, कविता मोरे, दैवशाला साबळे, भालेराव बाई, कल्पना भुक्तर आदींची उपस्थिती होती.

### सांदीपनी पब्लीक स्कूलचे घवघवीत यश



हिंगोली– सांदिपनी पब्लिक स्कूल, सुनील नगर, तरोडा बुद्रुक, नांदेड येथील शाळेने घवघवीत यश संपादन केले आहे. स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ अंतर्गत राष्ट्रीय गणित दिवसानिमित्त विद्यापीठात गणित विषयाला अनुसरून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर या जिल्ह्यातील असंख्य विद्यार्थ्यांनी भाग घेतला. या स्पर्धेतून सांदिपनी पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी कुआराध्या कदम (इयत्ता पाचवी) हिने विभागीय स्तरावर गणित विषयाच्या प्रकल्पाच्या सादरीकरणातून द्वितीय क्रमांक मिळवला आहे. या यशाबद्दल कुलसचिव स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, डॉ. डी. डी. पवार, गणितीय शास्त्र संकुल यांच्या उपस्थितीत, डॉ. के एल भंडार, सहसंचालक उच्च शिक्षण विभाग, नांदेड यांच्या हस्ते या विद्यार्थिनीला शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या यशाबद्दल शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, विपुल राठोड, सौ. रेश्मा राठोड, सौ. माहेश्वरी राठोड, शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रीत कौर, प्रशासक मारुती मेखाले, गणिताचे व शाळेतील सर्व शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# नर्सी नामदेव येथे हनुमान मंदिराचा कलशारोहनाचा कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जानेवारी**
तालुक्यातील नर्सी नामदेव येथे असलेल्या संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या मंदिरासमोर हनुमान मंदिराचे बांधकाम करण्यात आले असून आज हनुमान मंदिराला कलशरोहन चा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. राम कथेच्या मंडपातून कलश याची भव्य मिरवणूक काढण्यात आली त्यानंतर गांगलवाडी चे आत्मानंद गिरी महाराज यांच्या हस्ते पूजाअर्चा करून कलश रोहन करण्यात आला.



नरसी नामदेव येथे राम कथा निमित्त सप्ताह चालू असून या सत्तेच्या कार्यक्रमातच आज हनुमान मंदिराचा कार्यक्रम संपन्न झाला यावेळी मोठ्या संख्येने महिला पुरुष भाविक भक्त उपस्थित होते.
यावेळी बळीरामजी मुटकुळे, संतोष टेकाळे, रवी कान्हेड, रमेश महाराज मगर, उत्तम महाराज लांबाडे, शशिकांत गवते, शाहुराव देशमुख, दत्तराव वरणे, दिपक रगड, यांच्यासह मोठ्या संख्येने महिला पुरूष भाविक भक्त उपस्थीत होते. हनुमान मंदिराचे संपूर्ण बांधकाम संतोष टेकाळे केसापुरकर यांच्या वतीने करण्यात आले.

# ग्रामपंचायत सदस्यांना अभिलेखे देण्यास टाळाटाळ

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जानेवारी**
सेनगाव तालुक्यातील पळशी ग्रामपंचायतीच्या सदस्यांनी ग्रामपंचायतीकडे दि १०/१०/२०१९ ते ०९/०९/२०२३ पर्यंतचे विविध प्रकारच्या अभिलेख्यांची मागणी केली आहे. परंतु सदरील ग्रामसेवक आणि इतर अधिकारी अभिलेखे देण्यास टाळाटाळ करीत असल्यामुळे ग्रामपंचायत सदस्यांनी थेट जिल्हाधिकारी यांचेकडे तक्रार केली आहे.
पळशी येथील ग्रामसेवक आर एस गोर्डे यांच्या कालावधीत गावात झालेल्या विविध विकास कामांची माहीती तसेच ग्रामसभा, मासिक सभा त्यावर ग्रामसेवक आणि सरपंच यांच्या टिपण्या आणि अभिप्राय यांची माहीती तसेच विविध विकास योजनेच्या निधी, ग्रामनिधी मधून खरेदी करण्यात आलेले साहीत्य आदींची मागणी करण्यात आली होती परंतु गटविकास अधिकारी तसेच इतर अधिकारी संबंधीत ग्रामसेवकाला पाठीशी घालत असून अद्याप कोणतेही अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आले नाही. विशेष म्हणजे आर एस गोर्डे यांची बदली होऊन एक वर्ष उलटून गेले आहे. बदली झाल्यानंतर सात दिवसात पदभार हस्तांतरीत करावा लागतो. संबंधीत ग्रामसेवक बनावट व बोगस अभिलेखे तयार करण्याची भिती ग्रामपंचायत सदस्य नंदा पवार आणि गजानन गांजरे यांनी व्यक्त केली आहे.

# डॉ. प्रकाश अंभोरे यांना संत गाडगेबाबा राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जानेवारी**
हिंगोली येथील भारतीय विद्यामंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा हिंगोली जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश अंभोरे यांना संत गाडगेबाबा राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. दैनिक भारत संग्राम आयोजित स्व. मधुकरराव खंडारे यांच्या स्मृती प्रित्यर्थ तसेच सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त व समाजभूषण अर्जुन गवई यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा २०२४-२५ साखरखेर्डा ता. सिंदखेड राजा जि. बुलढाणा येथे दिनांक ३० डिसेंबर २०२४ रोजी संपन्न झाला. डॉ.प्रकाश अंभोरे यांनी माध्यमिक शिक्षक पदावर कार्यरत असताना फिजिक्स विषयात पीएच.डी. पदवी संपादन करून दहा शोध निबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर शोध पत्रिकेत प्रसिद्ध केले. तसेच एकूण १४ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील परिषदेच्या माध्यमातून आपल्या संशोधनाचे सादरीकरण केले. माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक पद सांभाळून महामानवांच्या जयंती व पुण्यतिथी निमित्त व्याख्यानाच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे काम अविरत चालू ठेवले आहे. तसेच शाळेच्या गुणवत्तेचा आलेख उंचावला आहे. यामुळे त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांचा प्राचार्य रमेश ठोसरे, उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे, वस्त्रोद्योग महामंडळाचे अध्यक्ष रविकांत तुपकर इत्यादी



मान्यवरांच्या हस्ते सुवर्णपदक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिन खंडारे यांनी केले. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष दिलीप खंदारे, कार्यक्रमाचे अध्यक्ष सय्यद रफिक हे होते. सौ. वैशालीताई तायडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. याबद्दल डॉ. प्रकाश अंभोरे यांचे भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्थेचे सर्व संचालक व संपूर्ण स्टाफ तसेच मुख्याध्यापक संघाचे पदाधिकारी व अप्तस्वकीय यांनी अभिनंदन केले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# नांदेड जिल्ह्यात वाचन संकल्प महाराष्ट्राचा पंधरवड्यास मोठ्या उत्साहात प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०२ जानेवारी**

वाचन संकल्प महाराष्ट्राचा वाचन पंधरवाडयानिमित्त नांदेड जिल्हयातील सार्वजनिक ग्रंथालयामध्ये १ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत ग्रंथप्रदर्शन व वाचन सामूहिक कार्यक्रम असे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या निर्देशाप्रमाणे १ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाअंतर्गत जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय व जिल्हयातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने आज विविध कार्यक्रमांची सुरुवात झाली त्यामध्ये ग्रंथप्रदर्शन,वाचन कौशल्य कार्यशाळा निवडलेल्या पुस्तकांचे सामुहिक वाचन लेखन व विद्यार्थी यांच्या मधील वाचन संवाद कार्यक्रम,पुस्तक परिक्षण व कथन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय व राम मनोहर लोहिया सार्वजनिक वाचनालय,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड या अभ्यासिकेत सामुहिक वाचन करताना जिल्हा ग्रंथालय अधिकारी अ.वा.सुर्यवंशी, महापालिकेचे ग्रंथपाल श्रीनिवास इज्जपवार यांनीही विद्यार्थ्यासोबत सामुहीक वाचन करुन वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाची सुरुवात केली. नांदेड जिल्ह्यात आज संभाजी सार्वजनिक वाचनालय,वाढवणा, भगवान श्रीकृष्ण वाचनालय,भोकर, हु.संतराम कांगठीकर वाचनालय, अर्जापूर, सचखंड गुरुव्दारा संचलित श्री हुजूर साहेब सार्वजनिक वाचनालय, नांदेड, डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाचनालय, नगर परिषद कंधार, श्री समर्थ वाचनालय देगलूर, श्री संत नारायणगीरी महाराज सार्वजनिक वाचनालय वासरी, का. मातोश्री सुंदराबाई सार्वजनिक वाचनालय,बिलोली यांनी या उपक्रमात प्रामुख्याने सहभाग घेतला.



## नायगांव येथील दत्तनगरातील दुकानाला भीषण आग



**तभा वृत्तसेवा**
**नायगांव,दि. ०२ जानेवारी**

नरसी नायगाव रोड लगत असलेल्या दत्तनगर येथील धनंजय कॉम्प्लेक्स मधील शिवपार्वती कन्स्ट्रक्शनरी अँड जनरल स्टोअर्स किराणा या होलसेल दुकानाला दि.३१ डिसेंबर रोजी पहाटेच्या सुमारास विद्युतच्या शर्ट सर्किटमुळे भीषण आग लागून मोठे नुकसान झाले

नायगांव येथील नरसी रोड लगत धनंजय कॉम्प्लेक्स शिव पार्वती कन्फेशनरी जनरलस्टोअर्स अँड किराणा हे दुकानात दिनांक ३१ डिंसेबरच्या रात्री विद्युतच्या शर्ट सर्किटमुळे दुकाना सह सामाजिक कार्यकर्ते गजानन पा. चव्हाण यांचे जनसंपर्क कार्यालय देखील जळून खाक झाले आहे. दुकान मालकाने दि. ३० रोजी रोजी दुकान रात्रीला १०.३० च्या दरम्यान बंद करून घरी गेले असता दुकान जळाल्याची माहिती समोर असलेल्या दस्तगीर मामू यांनी फोन वरून गणेश भाऊराव देगावे व गजानन पाटील चव्हाण यांना कळविले.ही माहिती समजताच या दोघांनी वेळ अंदाजे पहाटे अडीच ते तीन वाजता दुकानाकडे धाव घेतली व प्रत्यक्ष घटना पाहून नगर पंचायत व पोलीस प्रशासकीय अधिकारी यांना कळवून अग्निशामक गाडी बोलावून घेतले. लागलेली आग सकाळी सात वाजेपर्यंत वीजवण्यासाठी नगरपंचायत व पोलीस प्रशासना सह गावकऱ्यांनी सोबत घेऊन अग्निशामका च्या साह्याने आग विजवली. त्यात दुकानातील कन्फेशनरी व जनरल स्टोअर्स किराणा सामान व फर्निचर व कागदपत्र, जीएसटी बिल, महत्वाचे कागदपत्र जळून खाक झाले आहे. या आगीमध्ये लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

सदर दुकानांना लागलेली आग ही शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत असला तरी या आगीत लाखो रुपयाचा माल मात्र जळून खाक झाला आहे.

## संक्षिप्त वृत्त

### पुरवठा अधिकारी पंडीत राठोड यांची विभागीय चौकशी करावी : पत्रकार संघटनेची मागणी

**धर्माबाद**-तालुक्यातील गोरगरीब जनतेला शासन मोफत धान्य पुरवठा करीत असले तरी प्रत्यक्षात पुरवठा विभागाचे नायब तहसिलदार पंडीत राठोड यांच्या एकाधिकार शाही पणामुळे अनेक पात्र लाभार्थ्यांना धान्य मिळेनासे झाले आहे. स्वस्त धान्य वितरण व्यवस्था पारदर्शक राहावी म्हणून सरकारने ई पॉस मशीन मार्फतच राशन वाटप करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र अनेक जनतेचे धान्य गायब केले जाते. आणि दर दोन महिन्याला एकदा लाभार्थ्यांचा अंगठा घेतला जातो. प्रत्येक महिन्याला शासन धान्य पुरवठा करूनही विलंबाने वाटून मध्येच एक महिना गॅप करून त्या महिन्याचे धान्य गायब केले जाते. तालुक्यात मागील वर्षभरात एकदाही ई पॉस मशीन मार्फत शंभर टक्के धान्य वाटप का झाले नाही आणि हा प्रकार म्हणजे भ्रष्टाचारास एक प्रकारे हातभार लावण्यासाठी तर होत नाही का? या पुर्वी नायगाव विधानसभा मतदार संघाचे आमदार राजेश पवार साहेब यांनी या संदर्भात मागील वर्षी जिल्हाधिकारी साहेबांना पत्र पाठवून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली होती त्यानुसार जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी शासकीय धान्य गोदामात धाड टाकली पण कारवाई मात्र का करण्यात आली नाही.तालुक्यांतील गोर गरीबांचे धान्य वाटप न करता त्या धान्याची काळ्या बाजारात विक्री करणाऐया दुकान चालकांचे परवाने रद्द करण्यात यावेत. तसेच या प्रकारास जबाबदार असलेले पुरवठा विभागाचे नायब तहसिलदार पंडीत राठोड यांना निलंबित करण्यात यावे. अशी मागणी धर्माबाद पत्रकार संघटना तालुकाध्यक्ष बाबुराव आलुरकर, व धर्माबाद तालुका बहुभाषिक पत्रकार संघाचे अध्यक्ष लखमावाड पोतन्ना,बाबुराव दत्ता गोणारकर, यांनी तहसीलदार सुरेखा स्वामी मॅडम यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे

### गोडसे परिवारातर्फे मोफत आरोग्य शिबिर

**मुदखेड**-मुदखेड नगरीत स्व. राजमनीबाई विश्वनाथराव गोडसे यांच्या ९ व्या स्मृतिदिनानिमित्त मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन दि. ४ जानेवारी करण्यात आले आहे. आरोग्य शिबिरात मधुमेह, रक्तदाब, नेत्ररोग रुग्णांची मोफत तपासणी तसेच विनाशुल्क चष्मे व औषधी वाटप करण्यात येणार असल्याची माहिती आयोजक बालाजी गोडसे यांनी दिली आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी गोडसे परिवाराच्या वतीने स्वर्गीय राजमनीबाई यांच्या स्मृतिदिना निमित्त महारोग आरोग्य निदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात मधुमेह, नेत्ररोग, अस्थिरोग तथा कान, नाक व घसा आदी तज्ञ वैद्यकांकडून तपासणी केली जाणार आहे. त्याचबरोबर आवश्यक असणाऱ्या रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केली जाणार आहे. शहरातील व तालुक्यातील गरजू रुग्णांनी महा आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन विश्वनाथ गोडसे, बालाजी गोडसे, काँग्रेस शहराध्यक्ष कैलास गोडसे, सिताराम गोडसे, नवनाथराव गोडसे, भगवानराव गोडसे, पंढरीनाथ गोडसे, सुरेश गोडसे, व्यंकटेश गोडसे, राजू गोडसे, गणेश गोडसे, नितीन गोडसे, सचिन गोडसे, सुमित गोडसे, साईनाथ गोडसे यांच्या वतीने करण्यात आले आहे.



### व्हाईस आफ मीडीयाच्या अध्यक्षपदी रज्जाक कुरेशी तर सचिवपदी अशोक लोणीकर



**मुक्रमाबाद**-मुक्रमाबाद येथील शासकीय विश्रामगृहात दि. २९ डिसेंबर रोजी व्हाईस आफ मीडीयाची बैठक पत्रकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश जोशी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. प्रारंभी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर या बैठकीत सर्वानुमते व्हाईस आफ मीडीया शाखा मुक्रमाबाद ची नुतन कार्यकारणी जाहिर करण्यात आली. यामध्ये व्हाईस आफ मीडीया मुक्रमाबाद अध्यक्षपदी रज्जाक कुरेशी तर सचिवपदी अशोक लोणीकर, कार्याध्यक्षपदी जलील पठाण, उपाध्यक्ष रमेश राचलवार, संघटक मष्णाजी बाजगीरे, सहसचिव बालाजी दमकोंडवार, कोषाध्यक्ष शाकेर काझी, प्रसिद्धी प्रमुख ज्ञानेश्वर राजूरे, सदस्य बस्वराज वंटगीरे, काशीनाथ इंदुरे, सदस्य गणेश अकुलवार, आदिंची निवड करण्यात आली असुन पत्रकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश जोशी व जिल्हाकार्याध्यक्ष बाळासाहेब पांडे यांच्याहस्ते निवडीचे नियुक्ती पत्र देऊन अभिनंदन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक पोलिस भालचंद्र तिडके, अजित पवार , केशव रापतवार, बाबुराव वाघमारे, सतिश वाघमारे, आदि उपस्थित होते. त्यांच्या या निवडीबद्दल सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन सुरेशदादा पंदीलवार, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष गौसखाँ पठाण, सदाशीव बोयवार, शेतकरी संघटनेचे नेते शिवशंकर कलंबरकर, दिनेशअप्पा आवडके, आदिंनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या, कार्यक्रमाचे सूत्रसंचलन पत्रकार रज्जाक कुरेशी यांनी केले तर मष्णाजी बाजगीरे, यांनी आभार मानले.

## दिपनगर मार्केट कमिटीच्या अध्यक्षपदी सुरेश पवार तर उपाध्यक्षपदी संगिता पारवे



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०२ जानेवारी**

शहरातील दिपनगर येथील भाजी-पाला मार्केट कमिटीच्या अध्यक्षपदी सुरेश पवार तर उपाध्यक्षपदी संगिताबाई पारवे यांची सर्वानूमते निवड करण्यात आली.

दिपनगर मार्केट कमिटीच्या वतीने आज दि. २ जानेवारी रोजी अन्नदान वाटप कार्यक्रम आयोजीत करण्यात आला. कार्यक्रमानंतर एक बैठक घेवून दिपनगर मार्केट कमिटीची कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यात अध्यक्षपदी सुरेश पवार, उपाध्यक्षपदी संगिताबाई पारवे यांची निवड करण्यात आली. उर्वरित कार्यकारीणीत कोषाध्यक्षपदी गिरीधारी थोरात, सल्लागार सुरज वाघमारे तसेच सदस्यपदी कैलास गाडगीळ, पावडे, अब्दुल रहेमान, हारून रशीद, मामा चवने, राजू पारवे, केशव पावडे, मनिषा पाटील, मोहम्मद अनीस, रहेमान सय्यद, हारून, धारु बुक्तरे, गयाबाई खंदारे, कौतिकबाई गायकवाड यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित कार्यकारणीचे भाजपा सरचिटणीस क्षितिज जाधव व मित्रपरिवारांनी अभिनंदन केले.

## माजी आमदार प्रदीप नाईक यांच्यावर अंत्यसंस्कार

**तभा वृत्तसेवा**
**किनवट/माहूर,दि. ०२ जानेवारी**

जलक्रांतीचे प्रणेते गोरगरीब सर्वसामान्यांचे आधारस्तंभ किनवट माहूर विधानसभा मतदारसंघाचे लाडके लोकप्रिय माजी आमदार प्रदीप नाईक यांच्या पार्थिव देहावर आज दहेली तांडा येथे शासकीय ईतमामात व हजारो जनसमुदायाच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.अंत्यविधीला मराठवाडा विदर्भ तेलंगणा राज्याचे माजी मंत्री, खासदार, आमदार, विविध पक्षाचे नेते,प्रशासनातील अधिकारी, नेतेमंडळी यांच्यासह किनवट व माहूर तालुक्यातील कानाकोपऱ्यातून मोठा जनसागर लोटला होता.

किनवट माहूर विधानसभा मतदारसंघाचे सलग तीन टर्म प्रतिनिधित्व केलेले माजी आमदार प्रदीप हेमसिंग नाईक यांचे १ जानेवारी २०२५ रोजी हैदराबाद येथे सकाळी पाच वाजताच्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने दुखद निधन झाले असून २ जानेवारी २०२५ रोजी त्यांच्या पार्थिव देहावर दहिलीतांडा या मूळगावी शासकीय ईतमामात अंतिम संस्कार करण्यात आले. सकाळी ११ वा अंत्ययात्रेला सुरुवात झाली.यावेळी पुष्पांचा वर्षाव करत प्रदीप नाईक अमर रहे!अमर रहे! अशा घोषणा देण्यात आल्या.प्रशासनाच्या वतीने पुष्पचक्र अर्पण करून सलामी देण्यात आली.तीनराउंड फायरिंग करत व गार्ड ऑफ ऑनर देऊन अंत्यसंस्कार करण्यात आले.कपिल प्रदीप नाईक यांनी मुखाग्नी दिला.

माजी गृहराज्यमंत्री अनिल देशमुख राज्याचे मृदू व जलसंधारण मंत्री संजय राठोड,माजी गृहराज्यमंत्री माधवराव किन्हाळकर,माजी केंद्रीय मंत्री सूर्यकांताताई पाटील, माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे, उद्योग व उच्च तंत्रशिक्षण



राज्यमंत्री इंद्रनील नाईक, हिंगोली लोकसभेचे खासदार नागेश पाटील आष्टीकर, आमदार भीमराव केराम, आ.बाबूराव कदम, आ. हेमंत पाटील, माजी आ. माधवराव जवळगावकर, खा. नागेश घोडाम, माजी आमदार शंकर अण्णा धोंडगे पाटील, माजी आमदार बापूराव राठोड,आमदार चंद्रकांत दानवे, माजी आमदार संजय वाघचौरे,माजी आमदार राहुल मोरे,माजी आमदार विजय भांबळे, माजी आमदार वीरेंद्र जगताप, माजी खासदार सुभाष वानखेडे, राष्ट्रवादीचे नेते सुधाकर दानवे, उमरखेडचे माजी आमदार विजय खडसे, अतिरिक्त जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर,अप्पर पोलीस अधीक्षक धरणे,राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर, माजी खासदार शिवाजीराव माने,माजी वनमंत्री जोगी रमन्ना, भीम टायगर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दादासाहेब शेळके,माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण,तहसीलदार शारदा चोंडेकर, डॉ बी डी चव्हाण,श्याम भारती महाराज आदींनी पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. वैचारिक मतभेद बाजूला ठेवले तर जातिभेदाच्या पलीकडे जाऊन सामाजिकदृष्ट्या व किनवट माहूर विधानसभा मतदारसंघाच्या विकासात्मक दृष्टिकोनातून प्रदीप नाईक यांनी स्नेहाचे संबंध जोपासले लोकनेते स्व. उत्तमराव राठोड कै. माजी आ.सुभाष जाधव यांचा राजकीय सांस्कृतिक व सामाजिक वारसा जोपासत प्रदीप नाईक यांनी सर्वसमावेशक राजकारण केले. हा वारसा कायम टिकून ठेवण्याची जबाबदारी आपण आता घेतली पाहिजे.प्रदीप नाईक यांचे अकाली निधन मनाला वेदना देणारे आहे परंतु या दुखातून सावरण्याचे बळ त्यांच्या कुटुंबाला मिळो अशी प्रार्थना मी रेणुकामातेच्या चरणी करतो अशा शब्दात आमदार भीमराव केराम यांनी श्रद्धांजली अर्पण केली. उपस्थित मान्यवरांनी श्रद्धांजलीपर मनोगतातुन माजी आमदार प्रदीप नाईक यांच्या राजकीय व सामाजिक जीवन चरित्रावर प्रकाश टाकला. अंत्यसंस्काराला किनवट माहूर तालुक्यातील कानाकोपऱ्यातून मोठा जनसागर उसळला होता.

## नवनिर्वाचित आमदारांचा भव्य नागरिक सत्कार सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. ०२ जानेवारी**

हदगाव- हिमायतनगरचे नवनिर्वाचित आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्यासह नांदेड व हिंगोली जिल्ह्यातील शिवसेनेचे निर्वाचित आमदार यांचा हदगाव शहरामध्ये भव्य नागरी सत्कार सोहळा अनिल पाटील बाभळीकर यांचा मार्गदर्शनात दि.४ डिसेंबर रोजी हदगाव येथे जिल्हा परिषद हायस्कूलच्या भव्य प्रांगणात आयोजित करण्यात आला असून यावेळेस शिवसेनेच्या मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.



नांदेड व हिंगोली जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाला मोठे यश मिळाले असून शिवसेनेच्या सर्व आमदारांचा भव्य नागरी सत्काराचे आयोजन माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनात आयोजन करण्यात आले आहे. या सत्कार सोहळ्यास आ. हेमंत पाटील, माजी खा. सुभाष वानखेडे, नांदेड उत्तरचे आ. बालाजीराव कल्याणकर, नांदेड दक्षिणचे आ. अनिल बोंढारकर , हदगाव - हिमायतनगरचे आ. बाबुराव कदम कोहळीकर, कळमनुरीचे आ. संतोष बांगर यांच्या उपस्थितीत कस्तुरी मंगल कार्यालयातून मान्यवरांची भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून जिल्हा परिषद हायस्कूलच्या प्रांगणात भव्य नागरी सत्कार सोहळा आयोजित केल्याची माहिती समिती प्रमुख माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल पाटील यांनी कळविले आहे. तरी या भव्य नागरी सत्कार सोहळ्यास हदगाव- हिमायतनगर तालुक्यातील शिवसेनेचा पदाधिकाऱ्यांनी तसेच कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## राष्ट्रवादीच्या बूथ कमिटी शाखा उभारणीला प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. ०२ जानेवारी**

राज्याचे नवनिर्वाचीत उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ना अजित दादा पवार यांच्या जुलै मध्ये होणाऱ्या वाढदिवसाचे औचित्य साधून उमरी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आला या बूथ कमीट्या व शाखा स्थापनेचा शुभारंभ आज नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी एक जानेवारी रोजी उमरी तालुक्यातील करकाळा ह्या गावातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी यांचे शुभ हस्ते करण्यात आला या प्रसंगी बोलताना राज्यात ना अजित दादा च्या नेतृत्वाखाली आपण पक्ष बाधनीच काम हाती घेतलं त्या वेळी नव्याने पक्ष बांधणी करण्याचं काम आव्हानात्मक होत गेल्या वर्षभरात सर्व स्तरावरील पक्ष बांधणी पूर्ण झाली जनतेने ही आमच्या कामाला प्रतिसाद देऊन जिल्ह्यातील सर्व विधानसभेचे उमेदवार निवडून दिले पुढील काळा त विकासाची कामे कशा पद्धतीने करता येतील या कडे आपण लक्ष देऊ गावकऱ्यांनी सभागृहाची मागणी केली ती निश्चित पने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करू असेही आश्वासन या वेळी धर्म अधिकारी यांनी गावकऱ्यांना दिले या प्रसंगी ना अजित दादा पवार यांच्या जुलै महिन्यात होणाऱ्या वाढदिवसाचे औचित्य साधून उमरी तालुक्यातून ६६ शाखा व बूथ कमिट्या बांधणी करण्याचा संकल्प तालुकाध्यक्ष व तालुक्याचे सर्व पदाधिकार्याच्या माध्यमातून आपण करीत आहोत.

या माध्यमातून पक्ष संघटन करणे महायुती शासनाची कामे जनतेपर्यंत नेण्याचाही प्रयत्न करू तसेच जिल्ह्यातील अन्य तालुक्यातही सर्व तालुकाध्यक्ष व बूथ कमिट्याच्या अध्यक्षांचा पाठपुरावा करून जिल्ह्यातही शखा उभारणीचे काम जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी यांच्या नेतृत्वाखाली करू असा निर्धार प्रदेश काँग्रेस चे सरचिटणीस तथा बूथ कमीटी चे जिल्हाध्यक्ष डॉ विक्रम देशमुख यांनी व्यक्त केला या कार्यक्रमात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष करकाळा या गावाच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली व त्यांचा सत्कार करण्यात आला कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हाअध्यक्ष दिलीपराव जी धर्माधिकारी यांचे हस्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या फलकाचे अनावरण फीत कापून व श्रीफळ फोडून शाखेचे रीतसर उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी ज्ञानेश्वर कदम, अविनाश पवळे, बालाजी अनेराये, कॉंब्राजी गुंठे, संतोष गुंठे, रावसाहेब वडजे, गणेश जाधव, मुजमिल बेग मोगल, बालाजी पवार आणि संतोष वाघमारे तळेगाव, राम जगेवाड, दांडेवाड, हवगीरराव निमटेककर, रमेश हैबते, गायकवाड इ. पदाधिकारी यांसह गावातील नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## डॉ.नानासाहेब जाधव शिक्षण क्षेत्राच्या माध्यमातून राष्ट्र उभारणी करणारे कर्मयोगी : आ.हेमंत पाटील

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. ०२ जानेवारी**

देशाचा आधारस्तंभ म्हणजे त्या देशाची युवा पिढी अर्थात शिक्षण घेणारी पिढी मानली जाते. श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कर्मयोगी डॉ. नानासाहेब जाधव यांनी गेल्या ४० वर्षात हजारो विद्यार्थ्यांना घडवून खऱ्या अर्थाने राष्ट्र उभारणीच्या कार्यास हातभार लावला असल्याचे प्रतिपादन माजी खासदार तथा महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे विद्यमान आ. हेमंत पाटील यांनी कर्मयोगी डॉ. नानासाहेब जाधव यांचा वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळ्या प्रसंगी केले.

सिडको परिसरातील वसरणी येथील वसंतराव नाईक महाविद्यालयच्या प्रांगणात श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने आयोजित या अभिष्टचिंतन समारंभाला आमदार हेमंत पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना देशाचा आधारस्तंभ म्हणजे त्या देशाची युवा पिढी अर्थात शिक्षण घेणारी पिढी मानली जाते. आणि ती पिढी घडविण्याचे काम शिक्षण कर्मयोगी डॉक्टर नानासाहेब जाधव हे करत आहेत असे मत व्यक्त केले.या प्रसंगी लोहा कंधारचे आ. प्रताप पाटील चिखलीकर प्रामुख्याने सोहळ्याला उपस्थित रहावून डॉ.नानासाहेब जाधव यांच्या कार्यकर्तृत्वाचे कौतुक करतांना म्हणाले की नानासाहेब जाधव जाधव हे कंधार तालुक्याचे भूमिपुत्र आहेत. शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या नानासाहेब जाधव यांनी शिक्षण क्षेत्रामध्ये मोठी क्रांती करून सामाजिक उत्थानाला हातभार लावलेला आहे.

यावेळी वाढदिवसाचे औचित्य साधून डॉ. नानासाहेब जाधव यांचा संस्थेच्या विश्वस्त आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. शांतादेवी जाधव यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला स्वारातीम विद्यापीठाचे परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाचे माजी संचालक डॉ. रवी .एन. सरोदे, प्राचार्य डॉ.अशोक गवते पाटील, प्राचार्य डॉ. विकास कदम, समाज कल्याण अधिकारी सत्येंद्र आवूलवार, प्रसिद्ध कायदे तज्ञ ॲड. विश्वंभर गुणाले, प्रकाश भिलवंडे, सुनील राठोड,कैलास राठोड, विजय जाधव, प्राचार्य डॉ.हनुमंत आगलावे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुदाम राठोड, शंकर पवार, पुंडलिकराव जाधव, विनय गिरडे,धनंजय चव्हाण, नीलम जाधव, प्रदीप चव्हाण, योगेश राठोड, सुरज चव्हाण, मतीन भाई, दत्ता भाऊ जाधव, संस्थेचे कोषाध्यक्ष ॲड.श्रीनिवास जाधव, आमदार यांचे प्रतिनिधी म्हणून सरस्वती आनंदराव बोंढारकर आदींनी आपल्या मनोगतातून त्यांच्या कार्याचे कौतुक करून अभिष्टचिंतन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रा.मनीषा मांजरमकर यांनी केले.सुप्रसिद्ध निवेदक गणेश चव्हाण यांनी अभिष्टचिंतन सोहळ्याचे बहारदार सूत्रसंचालन केले. वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमासाठी श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाच्या समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसीयोद्दीन मुजावर, वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार तसेच संस्थेच्या विविध महाविद्यालयाचे प्राचार्य,प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आदींनी पुढाकार घेतला होता.

## भिमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त मोटार सायकल रॅली

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. ०२ जानेवारी**

भिमा कोरेगाव शौर्य दिना निमित्त सुशिलकुमार देगलूरकर मित्र मंडळाच्या वतीने देगलूर शहरतील प्रमुख मार्गाने भव्य मोटर सायकल रॅली काढून भिमा कोरेगाव युद्धातील ५०० शूर महार योध्याना सलामी देऊन मानवंदना देन्यात आली.

भारतीय संविधानाचे निर्माते विश्ववंदनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्या समोर भारतीय सविंधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले व नागार्जुन बुद्ध विहार येथे सामूहिक बुद्ध वंदना घेउन रॅलीची सांगता करण्यात आली रॅली यशस्वीतेसाठी पृथ्वीराज वाघमारे, रतन सूर्यवंशी, धम्मरत्न कांबळे, प्रतिक बिरकंगन, राष्ट्रपाल कांबळे, स्वप्निल देगलूरकर, कमलाकांत नरबागे, संदीप भास्करे, सुमित बकरे, माधव कांबळे, आभिभाऊ खानापूरकर, अजय सूर्यवंशी, अशोक बसवे, आतिश वाघमारे, अभिषेक भास्करे, विजय सूर्यवंशी, सचिन होनसांगडे, विजयराज सोनकांबळे, सुनिल शेरे, मुन्ना सूर्यवंशी, सोयल शेख, दीपक होनसांगडे, आदींनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



## जैन टॅगच्या अध्यक्षपदी श्वेता कासलीवाल तर उपाध्यक्ष पुर्वा कासलीवाल,सचिव जयश्री लोहाडे,कोषाध्यक्ष श्वेता गंगवाल



छत्रपती संभाजीनगर : नेहमी सामाजिक व जनकल्याणकारी कार्यात अग्रेसर असलेल्या व वर्षभर विविध नवनवीन उपक्रम राबविणा-या जैन टॅग ग्रुपच्या नुतन अध्यक्ष पदी श्श्वेता कासलीवाल तर उपाध्यक्ष पदी पुर्वा कासलीवाल,सचिव पदी जयश्री लोहाडे,कोषाध्यक्ष पदी श्श्वेता गंगवाल यांची २०२५ साठी एकमताने निवड करण्यात आली. यावेळी जैन टॅगच्या संरक्षिक अनुपमा दगडा दिपीका बडजाते,, यांच्या मार्गदर्शनाखालील हि निवड करण्यात आली. यावेळी मावळत्या अध्यक्षा रिचा कासलीवाल यांनी आपला पदभार अध्यक्षा श्श्वेता कासलीवाल यांच्याकडे सोपविला. यामध्ये कार्यकारणी मध्ये रिना ठोळे याशिका पांडे स्वाती कासलीवाल,छाया कासलीवाल,रचना पहाडे,नेत्रजा कासलीवाल,मिताली काला,रानु सेठी,सिमा बडजाते,सारिका बडजाते,किर्ती पाटणी,उज्वला पाटणी,सपना पाटणी,पुजा झांजरी आदींची सदस्य पदी निवड करण्यात आली.

नुतन कार्यकारणीला सकल जैन समाज,खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबजार चे अध्यक्ष महावीर पाटणी,सचिव प्रकाश अजमेरा,विजय अजमेरा, दिनेश सेठी, ॲड.अनिल कासलीवाल, निकेतन कासलवील, आनंद सेठी, पदम गंगवाल, संतोष अजमेरा यांच्यासह आदींनी शुभेच्छा दिल्या. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी दिली.

## कारखान्यात काम करताना कामगाराचा मृत्यू

वाळूज महानगर, (प्रतिनिधी)- वाळूज औद्योगिक वसाहतीतील झांबड चौक परिसरातील शुभम इंडस्ट्रीज या कारखान्यात जुने पत्र बदल्याचे काम सुरू होते. यावेळी ठेकेदारामार्फत आणलेला कामगार गणेश लक्ष्मण शेजवळ वय ३८, रा. कमळापूर हा कामगार पत्रे बदलताना तोल जाऊन खाली पडला. उंचावरून पडल्याने शेजवळ हे गंभीर जखमी झाले होते. त्यांना बेशुद्धावस्थेत घाटी रुग्णालयात दाखल केले असता, डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले. याप्रकरणी वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात नोंद घेण्यात आली असून, पुढील तपास पोलिस करीत आहेत.

## बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट

वाळूज महानगर, (प्रतिनिधी)- पंढरपूर येथे सोनार गल्ली व विठ्ठल रुखमाई मंदिरासमोरील भागामध्ये वैद्यकीय पदवी न घेता सर्रासपणे डॉक्टर म्हणून दवाखाना सुरू करत रुग्णांना वैद्यकीय सेवा देण्याचे काम बोगस डॉक्टरांकडून होत आहे. विशेष म्हणजे एक बंगाली डॉक्टर म्हणून प्रसिद्ध असून, तो आपल्या दवाखान्यात अनधिकृतपणे शस्त्रक्रियाही करीत असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते पवन बोर्डे यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. तसेच या दोन बोगस डॉक्टरांवर कारवाई न केल्यास ६ जानेवारी पासून आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## हम यहाँ के दादा है म्हणत कामगाराला बेदम मारहाण

वाळूज महानगर, (प्रतिनिधी)- वाळूज महानगर परिसरात गल्लीबोळात छपरी तरुण स्वतःला दादा म्हणत त्यांच्याकडून टवाळखोरीच्या प्रकारात दिवसेंदिवस वाढ होत आहे. पोलिस प्रशासनाने या टवाळखोरांना वेळीच आवर घालण्याची मागणी कामगार वर्गातून होत आहे. पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, वाळूज एमआयडीसी परिसरातील एका कारखान्यात काम करणारे बलीराम लालजी पाठक हे हेल्पर म्हणून काम करतात. ३१ डिसेंबर रोजी सायंकाळी ७.३० वाजेच्या सुमारास काम आटोपून पाठक हे मालकासोबत त्यांच्या कारमधून घरी जात असताना साजापूर येथील सय्यद अमन, सय्यद खलील व इतर दोन अनोळखी इसमांनी त्यांची गाडी आडवत 'हम यहाँ के दादा है' म्हणत बलीराम पाठक यांना लाकडी दांड्याने मारहाण करत जखमी केले. तसेच 'परत या परिसरात दिसला तर जिवंत मारून टाकू अशी धमकी दिली. या प्रकारामुळे कामगार वर्गात प्रचंड दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून, अशा रिकामटेकड्या व भाईगिरी करणाऱ्या टवाळखोरांना पोलिसांनी वेळीच आवर घालण्याची कामगार वर्गातून मागणी होत आहे.

## भिमाकोरेगाव येथे अन्नदान

वाळूज महानगर, (प्रतिनिधी)- वाळूज महानगर येथील नामदार संजय भाऊ शिरसाट मित्रमंडळाचे संस्थापक अध्यक्ष अशोक वाहूळ यांच्यावतीने भिमाकोरगाव येथे येणाऱ्या अनुयायींना अन्नदान करण्यात आले. यावेळी नामदार संजय शिरसाट मित्रमंडळाचे अध्यक्ष अशोक वाहूळ, चेतन सोनवणे, अनिल केदारे, सूर्यकांत पठारे, अमोल धुळे, किशोर दांडगे आदींनी परिश्रम घेतले. अन्नदानाचे हे सलग तिसरे वर्ष असून, पुढील वर्षी भव्य स्वरुपात अन्नदान करण्यात येणार असल्याचे वाहूळ यांनी सांगितले. यावेळी दहा हजार नागरिकांनी या अन्नदानाचा आस्वाद घेतला.

### जोरदार शक्तिप्रदर्शन, शेरो शायरीने वेधले लक्ष, अडीच वर्षानंतर मी पुन्हा येईल

# आ.अब्दुल सत्तारांवर शुभेच्छांचा वर्षाव

### स्थानिक नेत्याच्या कार्यक्रमानिमित्ताने मंडळाचे मैदान पहिल्यांदा भरले

#### दंड थोपटले; गुंडगिरी संपविण्यासाठी मीच छत्रपती संभाजीनगर ला येणार शिंदे यांचा माझ्यावर विश्वास असे पर्यंत मी शिवसेनेतच

सिल्लोड प्रतिनिधी( प्रतिनिधी ) दि.२, विविध पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते , मित्र परिवार व हितचिंतकांकडून लोकनेते माजी मंत्री आमदार अब्दुल सत्तार यांच्यावर शुभेच्छांचा अक्षरशः वर्षाव झाला. शहरातील मराठवाडा सांस्कृतिक क्रीडा मंडळाच्या मैदानावर जिल्हा मित्र मंडळाच्या वतीने आमदार अब्दुल सत्तार यांचा भव्य नागरी सत्कार व अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला होता.



थोरामोठ्यांचा आशीर्वाद व आपणा सर्वांचे प्रेम माझ्यासाठी कायम प्रेरणादायी आहे . तुमच्या या प्रेमापोटीच आयुष्यात संघर्ष करण्यास ऊर्जा मिळते असे प्रतिपादन यावेळी आमदार अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केले.

माझा मित्र गण सर्व पक्षातील आहे ते कायम माझ्या हाकेला साथ देतात. मंत्री असताना तर सर्वजण शुभेच्छा देण्यासाठी जमा होतात, पण मंत्री नसताना आपण जिल्ह्याच्या ठिकाणी माझा अभिष्टचिंतन सोहळा घडून आणला. हा अविस्मरणीय क्षण माझ्यासाठी आयुष्यात कायम आठवणीत राहील असे सांगत आ. अब्दुल सत्तार यांनी आयोजकांचे आभार मानले.

स्थानिक नेत्याच्या कार्यक्रमानिमित्ताने मंडळाचे मैदान पहिल्यांदा भरले.

आमदार अब्दुल सत्तार यांचा अभिष्टचिंतन सोहळा ऐतिहासिक व्हावा यासाठी मित्र मंडळाच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली होती. या कार्यक्रमास जिल्ह्यासह जवळपास सर्वच भागातील पदाधिकारी, नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. आ. अब्दुल सत्तार यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त स्थानिक नेत्याच्या नेत्याच्या कार्यक्रमानिमित्ताने मंडळाचे मैदान भरण्याची ही पहिलीच वेळ आहे.

जोरदार शक्तिप्रदर्शन

आ. अब्दुल सत्तार यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त त्यांच्या मित्र मंडळ व चाहत्यांमध्ये प्रचंड प्रमाणात उत्साह पहायला मिळाला. या कार्यक्रमात चाहत्यांची गर्दी पाहून आ. अब्दुल सत्तार यांचे जोरदार शक्तिप्रदर्शन पाहायला मिळाले.

काही दिवसापूर्वी स्थानिक नेत्याने त्यांना बेताल वक्तव्य करीत डिवचले होते. त्याचा अब्दुल सत्तार यांनी जोरदार समाचार घेतला. '' कुछ देर तक खामोशी है, फिर कानोमे शोर आयेगा, तुम्हारा तो सीर्फ वक्त है, हमारा तो दौर आयेगा, असे शेरो शायरीतून त्यांनी दंड थोपटले. गुंडगिरी संपविण्यासाठी मीच छत्रपती संभाजीनगर ला येणार असल्याचे देखील आ. अब्दुल सत्तार म्हणाले.

शिंदे यांचा माझ्यावर विश्वास असे पर्यंत मी शिवसेनेतच

नागरी सत्कार व अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त अनेकांनी तर्कवितर्क लावले होते याचा खुलासा देखील आ. अब्दुल सत्तार यांनी केला. आमचे नेते उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचा जो पर्यंत माझ्यावर विश्वास आहे तो पर्यंत मी शिवसेनेतच असणार असल्याचे अब्दुल सत्तार यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विकास कामासाठी निधी उपलब्ध करून दिला याबद्दल अब्दुल सत्तार यांनी त्यांचे आभार मानले.

याप्रसंगी खा. डॉ.कल्याणराव काळे, माजी आमदार सुरेश जेथलिया, चंद्रकांत दानवे, सुधाकर सोनवणे, भाऊसाहेब ठोंबरे ,उबाठाचे जिल्हाध्यक्ष राजू राठोड, प्रमोद जगताप, वैजापूरचे माजी नगराध्यक्ष बाळू शेठ संचेती, डॉ.दिनेश परदेशी ,माजी जि प सभापती विनोद तांबे, रामराव शेळके, किशोर बलांडे, अविनाश गलांडे ,रवींद्र काळे, कृष्णा डोणगावकर, जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पाटील गाढे, व्हाईस चेअरमन किरण डोणगावकर ,अभिजीत देशमुख, भाजपचे विनोद मांडलेचा, शेख अकील ,जगन्नाथ खोसरे, पुंडलिक काजे, माजी जी. प. अध्यक्ष श्रीराम महाजन, जिल्हा दूध संघाचे चेअरमन गोकुळ सिंग राजपूत ,संचालक श्रीरंग पाटील साळवे, बाबासाहेब तायडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती केशवराव तायडे ,नंदकिशोर सहारे, फिरोज पटेल, चंद्रकांत जाधव ,संदीप बोरसे, खुलताबादचे नगराध्यक्ष ॲड. कमरोद्दीन आदिंसह जिल्ह्यातील विविध पक्षातील मान्यवरांची उपस्थिती होती.

## सोयगाव तालुका स्तरीय विद्यार्थी, पालक क्रीडा स्पर्धा संपन्न

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२ जानेवारी

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथील भव्य प्रांगणात तालुकास्तरीय कबड्डी खो-खो, क्रिकेट, संगीत खुर्ची, दोरीवरच्या उड्या, रस्सीखेच, तसेच १०० मीटर धावणे, गोळफेक विद्यार्थी व पालक क्रीडा स्पर्धा ह्या उत्साहपूर्ण वातावरण व प्रमुख मान्यवरांच्या पाहुण्यांच्या उपस्थित संपन्न झाल्या आहेत.



विकास मीना मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर,जयश्रीताई चव्हाण शिक्षणाधिकारी (प्राथमिक) शिक्षण विभाग छत्रपती संभाजीनगर व राजेंद्र देसले (उपमुख्य कार्यकारी अधिकारी)जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर,दादाराव आहिरे गटविकास अधिकारी, तात्यासाहेब माळी सहा. गटविकास अधिकारी सोयगाव आदींच्या उपस्थितीत जिल्हा परिषद केंद्रीय शाळेच्या मैदानावर सोमवारी पालकांनी बालपणाच्या आठवणींना उजाळा देत मोठ्या उत्साहात सहभाग घेवून आनंदाने तालुका स्तरीय कबड्डी खो-खो, क्रिकेट, संगीत खुर्ची दोरीवरच्या उड्या रस्सीखेच,१०० मीटर धावणे, गोळफेक विद्यार्थी व पालक क्रीडा स्पर्धा आव्हानात्मक मैदानी खेळ खेळले.

दरम्यान खेळाचे आयुष्यातील महत्व मान्यवरांनी यावेळी मैदानावर समजून सांगितले प्रत्येक पालक, महिला पालक व प्रत्येक विद्यार्थी खेळाडू यांच्याशी त्यांनी हितगुज केले,संवाद साधला प्रभावी शैलीत जीवनात खिलाडी वृत्तीने कसे वागावे व खेळ तसेच शैक्षणिक गुणवत्ता याचा मेळआखून यशस्वी कसे होता येते याचा मूलमंत्र सांगितला त्यांनी यावेळेस यांच्या प्रभावी भाषण शैलीमुळे व प्रभावी व्यक्तिमत्वामुळे सर्व भारावून गेले होते विद्यार्थ्यांनी अगदी मोकळेपणाने त्यांच्याशी हितगुज केले.स्पर्धेत केंद्रप्रमुख फिरोज तडवी,आण्णासाहेब पोळ,उमेश महिलपुरे, मुख्याध्यापक रामदास फुसे, मुख्याध्यापक मोतीराम जोहरे,मुख्याध्यापक किरण पाटील, परमेश्वर कोरे,पंकज रगडे, आदींसह शिक्षक उपस्थित होते.

तालुका स्तरावर स्पर्धेत संघ विजेते संघ पुढील प्रमाणे सोयगाव बिट - कबड्डी -महिला/ पुरुष/मुले /मुली खो खो -महिला /मुले रस्सीखेच -महिला १०० मीटर-महिला धावणे-महिला संगीत खुर्ची-महिला ,गोळा फेक - महिला, क्रिकेट --पुरुष बनोटी बिट खोखो -मुली

## दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल मध्ये क्रीडा दिवस साजरा



बिडकीन : पैठण तालुक्यातील निलजगाव येथे दरवर्षी प्रमाणे दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल मध्ये क्रीडा स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या प्रसंगी प्रमूख पाहूणे म्हणुन संस्थेचे अध्यक्ष ओमप्रकाश जैस्वाल, सचिव रोशन जैस्वाल निलजगावंचे उपसरपंच ,दादा साहेब कुषेकर, गावातील प्रतिष्ठित नागरिक भाऊसाहेब मोगल, विठ्ठल मोगल इत्यादि प्रतिष्ठित उपस्थित होते.प्रमूख पाहून्यांच्या हस्ते दिप्रज्वलन व मशाल पेटवून स्पर्धेची ची सुरवात झाली. क्रीडा प्रतीयोगितेत विविध प्रकारच्या खेळांचे आयोजन करण्यात आले होते जसे की १०० मीटर धावणे, लंगडी, खो खो , पोत्याची शर्यत, लिंबू चमचा इत्यादी खेळात सहभागी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेत विजयी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमूख पाहुण्याच्या हस्ते बक्षीस म्हणुन मेडल्स, प्रशस्ती पत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल निलजगाव चे मुख्याध्यापक .मयूर बाबू स्वामी यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दुर्गा प्रायमरी स्कूल बिडकीन चे प्राचार्य अभिजित इंगळे, मुख्याध्यापिका दर्शना कोकणे, सुनीता चव्हाण , दिक्षा साबळे, ओसीन शिंदे, जयश्री नजन , प्रतीक्षा बत्तले, आरती कावरे , अनुराधा ठाकूर, शिवानी ठाकूर, राणी हटकर ,आरती इंगळे सीमा वंजारे या सर्व शिक्षकांनी खूप परिश्रम घेतले.

## स्पर्धा परीक्षेसाठी दर्जेदार वाचन साहित्य महत्वाचे : डॉ संगमेश्वर नीला

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२ जानेवारी

आज स्पर्धा परीक्षा करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे.परंतु यश मिळणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या फार कमी आहे.यामागे दर्जेदार व शासन पुरस्कृत पाठय पुस्तक निर्मिती मंडळाचे पुस्तके वाचन करण्याचा अभाव हे एक कारण आहे. स्पर्धा परीक्षा करताना आपण



किती वाचन करतो यापेक्षा कोणते वाचन साहित्य वाचतो हे जास्त महत्त्वाचे आहे.विद्यार्थ्यांनी शक्यतो शासन निर्मित विविध पाठय पुस्तके,विश्वकोश,अहवाल या मूळ साहित्याचे वाचन करणे आवश्यक आहे.असे मत अहिल्याबाई होळकर विद्यापीठातील राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संगमेश्वर नीला यांनी मांडले.ते संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित व्याख्यानामध्ये बोलत होते.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार, उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. पंडित नलावडे आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे डॉ नीला यांनी रोजगार मिळवण्यासाठी अल्प मुदतीचे कौशल्य विकास विषयक कोर्सेस करणे ही काळाची गरज बनली आहे या संबंधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संयोजक प्रा.श्रीकृष्ण परिहार यांनी केले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा.संदीप निकम,पीएचडी संशोधक दिपक पगारे,भरत औरंगे,कृष्णा राठोड यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी डॉ.रामेश्वर मगर,प्रा.गणेश गायकवाड यांच्या सह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री स्वामी समर्थ केंद्रात वास्तुशांती व नवचंडी महायज्ञ संपन्न

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०२:- ढाकेफळ येथे श्री स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक विकास केंद्र नवीन बांधन्यात आलेले आहे, त्या निमित्ताने केंद्राच्या वास्तूशांती कार्यक्रम भव्य पालखी सोहळा व शोभायात्रा काढण्यात आली. व नवीन वास्तुची वास्तुशांती करण्यात आली,या प्रसंगी छत्रपती संभाजी नगरचे खासदार संदिपान पाटील भुमरे ,पुष्पाताई भुमरे यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थ महाराजांची आरती करण्यात आली.यावेळी स्वामी समर्थ मराठवाडा विभाग प्रतिनिधी व कार्यक्रमाचे अध्यक्ष विलासराव बापू देशमुख यांनी सर्व सेवेकऱ्यांना मार्गदर्शन केले.प्रतिष्ठाण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रविंद्र तात्या शिसोदे यांच्या अथक प्रयत्नातून हे श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र ढाकेफळ या ठिकाणी सुरू झाले.कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात



आले होते.या प्रसंगी प्रतिष्ठाण प्रसारक मंडळाचे सचिव राजेंद्र पाटील शिसोदे,विजयकुमार शिसोदे,ढाकेफळच्या उपसरपंच विजयाताई शिसोदे ,सविताताई शिसोदे, सुशिल पाटील शिसोदे,सुप्रियाताई शिसोदे, उज्वला ताई शिसोदे,अर्चना ताई शिसोदे व ढाकेफळ केंद्र प्रतिनिधी पांडुरंग मरकड,छावा जिल्हाध्यक्ष किशोर शिरवत,अन्नासाहेब जाधव,राजाराम खरात,पुष्पाताई गव्हाणे, दत्तात्रय औटे, मनोज खरात,किसन नाना लघाने,भगवानराव मुळे, मनोहर लिपाने,अरुण कोल्हे,काकासाहेब रणशूर,राजेश शिरवत,हरिभाऊ कोल्हे,चांगदेव शिंदे, संदिप शिसोदे, संगिताताई भागवत,शरद शिसोदे, मुकूंद शिसोदे,कैलास शिसोदे,संजय मरकड, ज्ञानेश्वर शिरवत,इम्रान पठाण,जाकेर शेख व समस्त श्री स्वामी समर्थ सेवेकरी यांची या धार्मिक कार्यक्रमाला उपस्थिती होती.

## ५ व ६ जानेवारीला गोविंदभाई श्रॉफ संगीत महोत्सव

छत्रपती संभाजीनगर - मराठवाड्याचा सवाई गंधर्व म्हणून ज्याचा लौकिक आहे असा स.भु शिक्षण संस्थेतर्फे आयोजित केला जाणारा गोविंदभाई श्रॉफ संगीत महोत्सव यावर्षी दि.५ व ६ जानेवारी २०२५ रोजी संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालय परिसर, औरंगपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न होणार असल्याचे सरचिटणीस डॉ. श्रीरंग देशपांडे यांनी पत्रकार बोलताना सांगितले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष, ॲड. दिनेश वकील,कोषाध्यक्ष मिलींद रानडे,सहचिटणीस ॲड. रामेश्वर तोतला,संयोजन समिती व सहचिटणीस डॉ. सुनिल देशपांडे,ओमप्रकाश राठी,प्रभारी प्राचार्य डॉ. आनंद चौधरी,उपप्राचार्य डॉ. संदीप चौधरी, संगीत विभाग प्रमुख,डॉ. संजय मोहड आदी उपस्थित होते.



पुढे बोलताना डॉ. श्रीरंग देशपांडे म्हणले की,महोत्सवाचे हे १८ वे वर्ष आहे. आतापर्यंत देशातील अनेक मान्यवर संगीत कलावंतांनी या महोत्सवात हजेरी लावली आहे.

शिक्षणाबरोबरच संगीत, नृत्य, नाट्य, शिल्प आणि क्रीडा अशा विविध प्रकारच्या कलांची नित्यनेमाने जपणूक होणे आवश्यक असते असे स.भु शिक्षण संस्थेचे धोरण आहे. या संकल्पनेतूनच प्रस्तुत संगीत महोत्सवाचे सातत्याने आयोजन होत असल्याचे ही त्यांनी नमूद केले. महोत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे सतारवादनातील सात पिढ्यांची उज्वल परंपरा असलेले इटावा घराण्याचे सुप्रसिध्द सतारवादक उस्ताद शाहीद परवेज यांचे सतारवादन होणार आहे. गायकी अंगाची सतार म्हणून त्यांची जगभर ख्याती आहे. त्याचप्रमाणे सुगम गायनात विशेषतः तरूणांच्या मनांवर अधिराज्य करणाऱ्या प्रथमेश लघाटे आणि मुग्धा वैशंपायन यांचे गायन या महोत्सवात रसिकांसाठी पर्वणी ठरणार आहे. मराठवाडयाच्या भूमीमध्ये कथ्थक आणि ओडीसी नृत्याचा प्रचार-प्रसार करणाऱ्या श्रीमती पार्वती दत्ता यांचे कथ्थक नृत्य व उदयोन्मुख शास्त्रीय गायिका कु. युगंधरा केचे हिचे शास्त्रीय गायन देखील या महोत्सवात सादर होणार आहे. प्रतिष्ठित आणि उदयोन्मुख कलावंतांना सक्षम व्यासपीठ मिळवून देण्यासाठी स.भु. शिक्षण संस्था नेहमीच प्रयत्नरत असते. मराठवाड्यात शास्त्रीय संगीत आणि इतर कलांना रुजविण्यासाठी संस्थेतर्फे जे प्रयत्न केले जातात त्याला आजपर्यंत जाणकार रसिकांचा उस्फूर्त प्रतिसाद लाभला आहे. यावर्षीसुध्दा रसिकांनी या महोत्सवाला मोठ्या प्रमाणात हजेरी लावून या संगीत महोत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन स.भु नियामक मंडळाच्या वतीने संस्थाध्यक्ष ॲड. दिनेश वकील व सरचिटणीस डॉ. श्रीरंग देशपांडे यांनी केले आहे.